RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

LATUR लातूर वर्ष ३४ वे अंक १५८ वा बुधवार, दिनांक १० सप्टेंबर २०२५ (सांज. दैनिक) पोस्ट परवाना नं. L2/RNP/OMD-52/24-26 पृष्ठे – ६ मो:९४२२४७२५०२ किंमत १ रुपया

आमच्याकडे सर्व प्रकारचे कॉम्प्युटर, नायलॉन रबरी शिक्के एका तासात तयार करून मिळतील

■ संपर्क ■

जडे ऑफसेट प्रिंटर्स



मित्र नगर, लातूर, फोन : २४२६०८

# उद्धव ठाकरेंसह दोन प्रमुख नेत्यांनी राज ठाकरेंची घेतली भेट

**मुंबई/वृत्तसेवा:** आगामी महापालिका निवडणुकीत ठाकरे बंधू युती होणार अशी चर्चा गेल्या काही महिन्यांपासून सुरू आहे. त्यातच गणपती दर्शनाच्या निमित्ताने उद्धव ठाकरे सहकुटुंब पहिल्यांदाच राज ठाकरे यांच्या शिवतीर्थ निवासस्थानी पोहचले होते. मात्र आज पुन्हा उद्धव ठाकरे, संजय राऊत आणि अनिल परब मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्या भेटीला शिवतीर्थ निवासस्थानी दाखल झाले. या भेटीवेळी मनसेचे प्रमुख नेतेही उपस्थित होते. त्यामुळे उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या सततच्या भेटीमुळे युतीबाबत कार्यकर्त्यांमधील उत्स्युकता शिगेला पोहचली आहे.



हिंदी सक्तीच्या मुद्द्यावरून एकमेकांच्या जवळ आलेले उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे आगामी काळात एकत्रित निवडणूक लढणार अशी चर्चा सुरू झाली. हिंदी जीआर मागे घेतल्यानंतर मराठी विजयी मेळावा या दोन्ही पक्षाकडून आयोजित करण्यात आला. यावेळी २० वर्षांनी पहिल्यांदाच राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकाच व्यासपीठावर आले होते. यावेळी दोन्ही नेत्यांमधील आपुलकी दिसून आली. त्यानंतर युतीची चर्चा जोर धरू लागत असतानाच राज ठाकरे यांनी युतीबाबत कुणीही भाष्य करू नये असा आदेश मनसे नेत्यांना दिला. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले. मात्र उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसाला राज ठाकरे यांनी अचानक मातोश्रीवर भेट देत मोठ्या भावाला शुभेच्छा दिल्या. त्यामुळे युतीच्या चर्चेने पुन्हा जोर धरला.

राज ठाकरे यांच्या मातोश्री दौऱ्यानंतर उद्धव ठाकरे शिवतीर्थला कधी जाणार अशी उत्सुकता होती. त्यातच गणेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी उद्धव ठाकरे, रश्मी ठाकरे, आदित्य ठाकरे हे राज ठाकरेंच्या शिवतीर्थ निवासस्थानी पोहचले. तिथे ठाकरे कुटुंबीय एकत्रित आले. जवळपास अडीच तास उद्धव ठाकरे राज ठाकरे यांच्या घरी होते. त्यानंतर आज पुन्हा उद्धव ठाकरे राज ठाकरे यांच्या घरी गेले आहेत. यावेळी ठाकरेंसोबत संजय राऊत, अनिल परब हे नेतेही उपस्थित आहेत. तर राज ठाकरे यांच्यासोबत मनसे नेते बाळा नांदगावकर हे हजर आहेत. त्यामुळे ठाकरे बंधूंची या भेटीगाठी आगामी महापालिका निवडणुकीसाठी राजकीय सूतोवाच देतायेत का अशी चर्चा सुरू झाली आहे.

**दसरा मेळाव्याला राज ठाकरे व्यासपीठावर दिसणार?**

अलीकडेच उद्धवसेनेचे आमदार सचिन अहिर यांनी दसरा मेळाव्यात ठाकरे बंधू एकत्रित दिसतील, येणारा दसरा मेळावा 'न भूतो न भविष्यती' असेल असे संकेत राज ठाकरेंबाबत दिले होते. त्यात आमची विचारसरणी एक असली तरी उद्धवसेनेच्या दसरा मेळाव्याला पक्षप्रमुख उद्धव ठाकरे मार्गदर्शन करतात आणि गुढीपाडव्याला राज ठाकरे त्यांच्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करतात. पण तरी प्रमुख पाहुणे म्हणून राज दसरा मेळाव्याला येऊ शकतात का? असे पत्रकारांनी विचारले असता हे मी कसे काय सांगणार? मी किंवा अन्य कोणी याविषयी मत व्यक्त करणे बरोबर नाही, ते उद्धव ठाकरे ठरवतील असं विधान खासदार संजय राऊत यांनी केले होते.

## धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र ऑटोरिक्षा मिटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी नोंदणी करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी:** महाराष्ट्र शासनाने ऑटोरिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालकांच्या कल्याणासाठी धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र ऑटोरिक्षा मिटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाची स्थापना केली आहे. या मंडळाच्या माध्यमातून चालकांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळणार आहे. सर्व ऑटोरिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालक संघटनेच्या सभासदांनी नोंदणीसाठी https://ananddighekalyankarimandal.org/ या अधिकृत वेबसाइटवर ऑनलाईन अर्ज करावेत. अर्जाची स्थिती तपासताना, सभासद फी भरण्यासाठी किंवा इतर संबंधित कामांसाठी वरील लिंकची पूर्ण खात्री करावी. चालकांनी केवळ अधिकृत वेबसाइटचाच वापर करावा, असे आवाहन शासनाने केले आहे.

## नक्षल चळवळीतील मोठा बदल!

नक्षलवाद्यांचा नेतृत्व आता तेलंगणामधील करीमनगर जिल्ह्यातील देवजी उर्फ संजीव उर्फ पल्लव करणार आहे.. नंबाला केशव उर्फ बसवराजु च्या एन्काऊंटर नंतर नक्षलवाद्यांचा सर्वोच्च सरचिटणीस (जनरल सेक्रेटरी) पद रिक्त होतं.. नक्षलवाद्यांच्या कोअर टीमने सरचिटणीस देवजीची नेमणूक केल्याची माहिती आहे.. तर पोलिसांविरोधातल्या लढ्यात अत्यंत महत्त्वाच्या दंडकारण्य स्पेशल झोनल कमिटी म्हणजे छत्तीसगडचे सात आणि महाराष्ट्रातील गडचिरोली अशा आठ जिल्ह्यातील सशस्त्र ऑपरेशनची जबाबदारी छत्तीसगड मधील भूमिपुत्र हिडमा कडे सोपवण्यात आली आहे. विशेष म्हणजे नक्षलवाद्यांकडून यासंदर्भात कुठलीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही.. एबीपी माझाला मिळालेल्या माहितीनुसार छत्तीसगडमध्ये नुकतंच एका नक्षल कमांडरने आत्मसमर्पण केले असून त्याच्या चौकशीत सुरक्षा दल आणि छत्तीसगड पोलिसांना सरचिटणीसपदी देवजी तर दंडकारणे स्पेशल झोनल कमिटीच्या सचिव पदी हिडमा याची निवड झाल्याची माहिती मिळाली आहे...

# नेपाळमध्ये अडकलेल्या भारतीय नागरिकांना महत्त्वाची सूचना

**लातूर/प्रतिनिधी:** नेपाळमध्ये उद्भवलेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्रातील नागरिकांसाठी महाराष्ट्र राज्य आपत्कालीन कार्य केंद्रामार्फत महत्वाच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

सध्या नेपाळमध्ये प्रवास टाळावा. जे नागरिक सध्या नेपाळमध्ये आहेत त्यांनी आपल्या निवासस्थानीच सुरक्षित राहावे. अनावश्यकपणे बाहेर पडू नये व स्थानिक प्रशासनाच्या तसेच भारताच्या दूतावासाच्या सूचनांचे पालन करावे. कोणत्याही प्रकारच्या मदतीसाठी दूतावासाच्या हेल्पलाइन क्रमांकांवर संपर्क साधावा:

+९७७–९८० ८६० २८८१
(व्हॉट्सॲप कॉलसाठीही उपलब्ध)
+९७७–९८१ ०३२ ६१३४
(व्हॉट्सॲप कॉलसाठीही उपलब्ध)

राज्य आपत्कालीन कार्य केंद्र, महाराष्ट्र, नागरिकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करत आहे. कृपया अधिकृत माध्यमांद्वारेच माहिती प्राप्त करावी व अफवांपासून दूर राहावे, असे आवाहनही राज्य आपत्कालीन कार्य केंद्रामार्फत करण्यात आले आहे.

राज्य आपत्कालीन कार्य केंद्र, महाराष्ट्र (९१– ९३२१५८७१४३ व्हॉट्सॲप कॉलसाठीही उपलब्ध ९१– ८६५७११२३३३ व्हॉट्सॲप कॉलसाठीही उपलब्ध)



लातूर शहर महानगरपालिके अंतर्गत अतिक्रमणावर मोठी कारवाई... शहरात विविध पाच ठिकाणावरील अतिक्रमणावर बुलडोझर चालविण्यात येत आहे...

# लाड कुटुंबाचे माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या कडून सांत्वन

**लातूर/प्रतिनिधी:** मुरुड तालुका लातूर येथील प्रसिद्ध सराफा व्यापारी व लातूर तालुका काँग्रेसचे उपाध्यक्ष कै. भारतआण्णा लाड यांचे काही दिवसापूर्वी दुःखद निधन झाले त्याबद्दल मुरुड येथील निवासस्थानी राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख साहेब यांनी सोमवारी सांत्वनपर भेट दिली लाड कुटुंबांचे सांत्वन केले



यावेळी मांजरा साखर कारखान्याचे उपाध्यक्ष, अशोकराव काळे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष ॲड प्रमोद जाधव, मारुती साखर कारखान्याचे चेअरमन शाम भोसले, रवींद्र काळे, बी. एस.दादा पठाडे, सचिन दाताळ, तालुका काँग्रेस अध्यक्ष सुभाष घोडके, मांजरा साखर कारखान्याचे संचालक दयानंद बिडवे, राणीताई खोडके, रामभाऊ गोरे, चेअरमन वैजनाथ नाडे, वैजनाथ जाधव, ईश्वरप्रसाद चांडक, दीपक पठाडे, डॉक्टर दिनेश नवगिरे, रमेश देशमुख, उद्धव सवासे, राजेंद्र मस्के, समाधान गायकवाड, संजय अंधारे इत्यादी उपस्थित होते.

# हुंडाबळीच्या खटल्यात पती, सासूला सक्तमजुरी; १५ वर्षांची शिक्षा

**लातूर/प्रतिनिधी:** हुंड्याच्या कारणावरून विवाहितेचा मृत्यू झाल्याच्या खटल्यात दोषी ठरलेला पती आणि सासूला लातूर येथील जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश आर. आर. भोसले यांनी १५ वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा सुनावली आहे.

सरकारी वकील मीरा कुलकर्णी यांनी सोमवारी सांगितले की, कल्पना हिचा विवाह २०१३ मध्ये सूर्यकांत जायभाये यांच्यासोबत १८ मे २०१३ मध्ये झाला होता. दरम्यान, विवाहाच्यावेळी पाच लाख हुंडा म्हणून देण्याचे ठरले होते. मात्र, प्रत्यक्षात तीन लाख रुपये आणि सोन्याचे दागिने देण्यात आले. हुंड्यातील उर्वरित दोन लाखांसाठी कल्पनावर सतत दबाव आणला जात होता. प्रारंभी दोन वर्ष संसार सुरळीत चालला. नंतर पती सूर्यकांत आणि सासू राधाबाई यांनी हुंड्यातील उर्वरित पैशांसाठी कल्पनाचा मानसिक व शारीरिक छळ सुरू केला. २४ फेब्रुवारी २०१७ रोजी कल्पनाला घरातून हाकलून दिले. ५ मार्च २०१७ रोजी तिचा मृतदेह सांडोळ (ता. चाकूर) शिवारातील एका विहिरीत आढळून आला. याबाबत वडिलांनी चाकूर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. पती, सासू आणि कुटुंबातील इतर मंडळीविरुद्ध गुन्हा दाखल करून, पोउपनि. संतोष गीते यांनी तपास केला.

साक्षीदारांचे जबाब, वैद्यकीय पुरावे आणि पंचनामा महत्त्वपूर्ण ठरला. या पुराव्याच्या आधारे हा मृत्यू नैसर्गिक नसून हुंड्याच्या छळामुळे झाल्याचे निष्पन्न झाले. अखेर सुनावणीअंती न्यायाधीश आर. आर. भोसले यांनी पती सूर्यकांत जायभाये व सासू राधाबाई जायभाये यांना हुंडाबळीप्रकरणी दोषी ठरवत १५ वर्षांचा सश्रम कारावास आणि प्रत्येकी २० हजारांचा दंड, तसेच कलम ४९८ (अ) अन्वये तीन वर्षांची शिक्षा व १५ हजारांचा दंड अशी शिक्षा ठोठावली.

सरकार पक्षाच्या वतीने ॲड. मीरा कुलकर्णी–देवणीकर यांनी युक्तिवाद केला. त्यांना सहायक वकील दिग्विजय माकणे, ॲड. ईश्वर वर्मा, ॲड. अभिनय मुंडे, ॲड. प्रसाद शेटे, ॲड. प्रथमेश डोंगरे यांनी सहकार्य केले. पैरवी अधिकारी म्हणून चाकूर ठाण्याचे चंद्रकांत राजमाले यांनी केले.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



सीपी राधाकृष्णन देशाचे १७ वे उपराष्ट्रपती !!



**चिमटा दयाचा**

सिंगल युज प्लास्टिकवर कारवाई होत आहे ! प्लास्टीक जप्तीबरोबर विकणारा व वापरणाऱ्यावर कठोर कारवाईची गरज आहे !!

# विद्यार्थ्यांनो सकारात्मक दृष्टीकोनाबरोबरच जिज्ञासू वृत्ती बाळगा : प्राचार्य डॉ. जाधव

## विश्वेश्वरय्या इंजिनीअरिंगमध्ये नवप्रवेशित विद्यार्थ्यांसाठी स्वागत समारंभ

**औसा/प्रतिनिधी:** तालुक्यातील आलमला येथील श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ, आलमला, ता. औसा, जि. लातूर व्दारा संचलित विश्वेश्वरय्या इंस्टिटयुट ऑफ इंजिनीअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी, आलमला महाविद्यालयात नव्याने सु डिग्री होत असलेल्या इंजिनीअरिंग महाविद्यालयातील नुतन प्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्हि.के. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली व संस्थेचे अध्यक्ष शिवचरण धाराशिवे, सचिव बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, प्राचार्य प्रशांत धाराशिवे, फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे, डॉ. कैलास धाराशिवे यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन स्वागत समारंभ संपन्न झाला.

प्रास्ताविकात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्हि.के. जाधव यांनी इंजिनीअरिंग साठी नुतन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे व पालकांचे स्वागत करून संस्था विद्यार्थ्यांच्या गुणात्मक वाढीसाठी राबवित असलेल्या विविध उपक्रमाची माहिती देत संस्थेने तंत्रशिक्षणातील एन.बी.ए. मानांकन दोन वेळेस प्राप्त करणारे मराठवाडयातील पहिलेच महाविद्यालय असल्याचे सांगितले तसेच महाविद्यालयात अद्ययावत सेवा सुविधा यामध्ये अद्ययावत प्रयोगशाळा, सुसज्ज ग्रंथालय, डिजीटल लायब्ररी, आर. ओ. शुध्द पिण्याचे पाणी सेवा उपलब्ध असल्याचे सांगितले. आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यामध्ये सकारात्मक दृष्टीकोन, जिज्ञासु वृत्ती, शिस्त आणि अभ्यासात सातत्य ठेवल्यास यश हमखास मिळते असे सांगुन विद्यार्थी हा चारित्र्यसंपन्न, नितिमुल्य जपणारा आणि समाजासाठी सक्रिय असणारा असला पाहिजे. संस्था तुम्हाला चांगला नागरिक बनविल्याशिवाय राहणार नाही असे सांगुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

संस्थेचे सचिव बसवराज धाराशिवे यांनी नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे व पालकांचे स्वागत करून विद्यार्थ्यांना शहरी व ग्रामीण हा मनातील न्युनगंड काढुन टाका तुमच्यामध्ये संशोधक वृत्ती तसेच जिज्ञासु वृत्ती बाळगा तुमचे स्टार्टअप आयआयटी सारख्या बाहेर देशातील विद्यार्थ्याबरोबर स्पर्धा करा असे सांगुन संस्था तुमच्यासाठी महाविद्यालयात महाराष्ट्रातील मल्टीनॅशनल कंपन्याचे कॅम्पस आयोजन करून तुम्हाला नौकरी देण्याचेही काम संस्था करेल असे सांगितले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. प्रा. चंद्रशेखर चरकपल्ले यांनी महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या गुणात्मक वाढीसाठी राबविल्या जाणाया सामाजिक, सांस्कृतीक, क्रिडा तसेच महाविद्यालयास मिळालेले पुरस्कार यासंबंधी पिपिटीव्दारे सखोल अशी माहिती दिली.




या कार्यक्रमास उपप्राचार्य गोपाळ दंडिमे, विभागप्रमुख रेवणसिध्द बुक्का, प्रा. प्रविण साबदे, प्रा. अंकुश बिडवे, प्रा. मंगेश बिडवे, प्रा. संदेश माडे, प्रा. अब्दुल समद काझी, प्रा. अजित लोकरे, प्राध्यापक वृंद, विद्यार्थी, पालक मोठया संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रोडगे साक्षी व अस्मा मुलानी यांनी तर आभार प्रदर्शन प्राचार्य प्रशांत धाराशिवे यांनी केले.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## समाजमाध्यमांवर बंदी घातल्याने आरजकता!

समाजमाध्यमांवरील बंदी नेपाळ सरकारने घातली व युवकांचा उद्रेक पाहुन ती परत घेतली, मुळात नेपाळमध्ये समाजमाध्यमांवरील बंदीविरोधात सोमवारी तरुणांनी राजधानी काठमांडूसह इतर अनेक ठिकाणी निदर्शने केली. या निदर्शनांना हिंसक वळण लागून त्यामध्ये १९ जणांचा मृत्यू झाला आहे. तसेच यामध्ये १०० जण जखमी झाले आहे. तरूण आंदोलनानी हाक देत नेपाळमधील काठमांडूच्या केंद्रस्थानी असलेल्या संसदेबाहेर जमले. या तरुणांमध्ये आधीच देशातील भ्रष्टाचारामुळे सरकारविरोधात संताप होता. त्यात समाजमाध्यमांवरील बंदीने आणल्याने भर घातली. त्यामुळे संतप्त तरुणांनी संसदेबाहेरील सर्व अडथळे तोडत एक रुग्णवाहिका पेटवली. सुरक्षा रक्षकांवर वेगवेगळ्या वस्तू फेकल्या, ज्यामुळे २८ पोलीस व सुरक्षा रक्षक जखमी झाले आहेत. दरम्यान, 'जेन-झीं'च्या या आंदोलनाला यश मिळाले आहे. नेपाळ सरकारने सोशल मीडिया अ‍ॅप्सवरील बंदी हटवली आहे. रात्री उशिरा यासंदर्भातला निर्णय घेण्यात आला. नेपाळचे दळणवळण, माहिती व प्रसारण मंत्री पृथ्वी सुब्बा गुरुंग यांनी घोषणा केली आहे की सरकारने समाजमाध्यमांवरील बंदीबाबतचा निर्णय मागे घेतला आहे. मुळात नेपाळ सरकारला या बाबत असा विचार लागू करण्याचा विचार मनात का आला असेल? यामागील सरकारला अयोग्य निर्णय वाटल्याने मागे घेतला असावा. याबाबत तरूणांनी विरोध का केला. सामोपचाराने हा मुद्दा सोडविता आला असता. तरी संसदेबाहेर आंदोलन तिव्र करावे लागले. मुळात प्रगती व विज्ञानाच्यायुगात सोशलमिडीया प्रभावी ठरत आहे. याबाबत कसा वापर करायाचा यावर बरेच आवलंबुन आहे. चांगला का वाईट या दोन्ही बाबी यात दिसून येतात. तरूणांत या बाबत विशेष आकर्षन आहे. ते निर्माण केले जाते. तरूणात सोशलमिडीया हीएक नशा म्हटले तरी चुकीचे ठरणारे नाही कारण या बाबत विचार केला पाहिजे. आज तरूण यात किती वाया जात आहेत. मोबाईलच्या व्यसनी बनत आहेत, याचा अंदाज घेतला पाहिजे. मोबाईल ही एक आवश्यक बाब आहे. यात दुमत नाही. मात्र याचा अतिरेक वाढतो ही बाब चिंताजनक आहे. नेपाळ सरकारने या बाबत हळू-हळू निर्णय घेणे अपेक्षित होते. एकदम कडक निर्णय घेणे घातक ठरते. तेच नेपाळ मध्ये घडले. वास्तविक सोशलमिडीयाचा कसा वापर करावा या बाबत जनजागृती आवश्यक आहे. तीचा वापर किती प्रमाणात करावा याबाबत चिंतन होत नाही. आवश्यक तेवढा वापर ठिक आहे. तरूणात या बाबत लागलेले व्यसन मोठी चिंता निर्माण करणारी बाब आहे. तरूणाच्या विरोधात एकदम काम करणे योग्य नाही. बंदी घालावयाची झाली तर टप्प्याने घातली पाहिजे होती. सर्रास बंदी नुकसानीचे ठरू शकते. त्यात तरूणाचा उद्रेक हा मोठा असतो. विचार करून तरूणाच्या विरोधात काम करावे लागते. नेपाळ सरकारने बंदी घातली खरी मात्र अधिक काळ टिकली नाही. शेवटी ती मागे घ्यावी लागली. हे योग्य नाही. बंदी घालण्यापुर्वी अंदाज घेतला पाहिजे होता. आता तरूण सोशालमिडीया शिवाय राहु शकत नाहीत. एक मोठे व्यसन अनेकांना लागले आहे. त्यात कठोर निर्णय घेणे उचित नव्हते. मुळात कोणत्याही देशात असोत तरूणाच्या विरोधात जाता येवू शकत नाही. त्यांना पहिल्यांदा समजावुन सांगितले पाहिजे. यामागील तोटे समजावुन सांगितले पाहिजे. त्याच प्रमाणे योग्य काय आहे व अयोग्य काय आहे या बाबत चिंतन करायाला भाग पाडले पाहिजे. मुळात आजच्या काळात सोशल मीडिया आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग झाला आहे. मोबाईल, इंटरनेट आणि डिजिटल क्रांतीमुळे सोशल मीडिया आपल्या हातात आला. फेसबुक, इंस्टाग्राम, ट्विटर, यूट्यूब, व्हॉट्सअ‍ॅप, टेलिग्राम यांसारख्या अ‍ॅप्समुळे जगभरातील माणसे एका क्लिकवर जोडली गेली आहेत. सोशल मीडियाचे अनेक फायदे नाकारता येत नाहीत; पण त्याचबरोबर त्याचे गंभीर दुष्परिणामही समाजावर, संस्कृतीवर, मानसिक आरोग्यावर आणि व्यक्तीच्या जीवनशैलीवर दिसून येतात. मानसिक आरोग्यावर परिणाम सोशल मीडियाच्या अति वापरामुळे ताण, नैराश्य, चिंता, एकटेपणा अशा समस्या वाढतात. सतत लाईक्स, कमेंट्स, फॉलोअर्स यांची संख्या बघण्याची सवय लागल्याने माणूस नकळत स्पर्धेत उतरतो. कुणाच्या पोस्टवर जास्त प्रतिसाद मिळाला की दुसरा न्यूनगंडाने ग्रासतो. स्वतःच्या आयुष्याची तुलना इतरांच्या फेक परफेक्ट आयुष्याशी केली जाते. त्यामुळे आत्मविश्वास कमी होतो व मानसिक थकवा वाढतो. शैक्षणिक व व्यावसायिक तोटे असे आहेत की, आजच्या पिढीतील विद्यार्थी तासनतास मोबाईलवर घालवतात. अभ्यासा ऐवजी ते रील्स, मीम्स, व्हिडिओ पाहण्यात मग्न असतात. एकाग्रतेवर परिणाम होतो, स्मरणशक्ती कमी होते. कामकाजाच्या वेळेतही कर्मचारी सोशल मीडियात गुंतल्याने उत्पादकता कमी होते. सर्वात अयोग्य बाब म्हणजे चुकीची माहिती व अफवा पसरवणे हा आहे. सोशल मीडियावर फेक न्यूज क्षणार्धात व्हायरल होतात. अपूर्ण किंवा चुकीच्या माहितीकडे लोकांचा कल वाढतो. राजकीय, सामाजिक, धार्मिक द्वेष पसरवण्यासाठी सोशल मीडियाचा वापर होतो. अफवा पसरल्यामुळे हिंसा, दंगे, भीती आणि सामाजिक तणाव वाढतो. गुन्हेगारी व सायबर क्राईम सोशल मीडियाच्या माध्यमातून अनेक प्रकारचे गुन्हे घडतात. फेक अकाउंट्स, ओळखी चोरी करणे, फसवणूक, ब्लॅकमेलिंग, हॅकिंग ही प्रकरणे मोठ्या प्रमाणात घडतात. लहान मुलांपासून ते महिलांपर्यंत अनेक जण सायबर बुलिंगचे बळी ठरतात. मैत्रीच्या नावाखाली सामाजिक नाती व कुटुंबव्यवस्था सोशल मीडिया माणसाला आभासी जगात घेऊन जातो. प्रत्यक्ष भेटीगाठी, संवाद, प्रेमळ नाती यांची जागा ऑनलाईन चॅट्सनी घेतली आहे. कुटुंबातील संवाद कमी होतो. जेवताना, फिरताना प्रत्येकाच्या हातात मोबाईल असतो. त्यामुळे भावनिक नातेसंबंध कमकुवत होतात. शारीरिक आरोग्यावर परिणाम मोबाईलचा अति वापर आणि सोशल मीडियाचे व्यसन यामुळे- झोपेचे विकार, डोळ्यांचे आजार, पाठदुखी, मानदुखी, स्थूलता वाढते. रात्री उशिरापर्यंत मोबाईल वापरण्यामुळे झोपेची गुणवत्ता कमी होते. लहान मुलांच्या विकासावर याचा प्रतिकूल परिणाम होतो. वेळेचा अपव्यय सोशल मीडियावर थोडा वेळ म्हणून बसलेला वापरकर्ता तासनतास वेळ वाया घालवतो. तो वेळ अभ्यास, काम किंवा कुटुंबासाठी वापरता आला असता. रील्स, व्हिडिओ, गेम्स या व्यसनाधीन गोष्टींमुळे उत्पादकता शून्यावर जाते. त्यामुळे चांगले पेक्षा वाईट परिणाम होणार असेल तर तरूणांची विचार केला पाहिजे. आता तर नेपाळप्रकरणावरून गंभीर विचार करावा लागेल.

# महापारेषणच्या नागपुरातील पाचगाव उपकेंद्राचे काम वेळेच्या अगोदरच पूर्ण, मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्याकडून कौतुक

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) नागपूर परिमंडळांतर्गत २२० के. व्ही. पाचगाव उपकेंद्र आणि संलग्नित २२० के. व्ही. कन्हान-उमरेड लिलो विद्युत वाहिनी (२२ सर्किट कि. मी.) निर्धारित कार्यपूर्ती वेळेच्या तब्बल आठ महिने अगोदरच पूर्ण करून कार्यान्वित करण्यात आली. त्यामुळे मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी महापारेषणचे कौतुक केले आहे.

ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव श्रीमती आभा शुक्ला (भा.प्र.से.) यांच्या निर्देशानुसार महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांच्या नेतृत्वाखाली नागपूर जिल्ह्यातील कुही तालुक्यात पाचगाव येथील २२०/३३ के. व्ही. उपकेंद्र आणि संलग्नित २२० के. व्ही. कन्हान-उमरेड लिलो वाहिनी निर्धारित कार्यपूर्ती वेळेच्या तब्बल आठ महिन्याआधी पूर्ण करून कार्यान्वित करण्यात आली.

२२०/३३ के.व्ही. पाचगाव उपकेंद्र कार्यान्वित झाल्यामुळे नागपूर जिल्ह्यातील कुही तालुका आणि लगतच्या नागपूर ग्रामीण भागातील घरगुती तसेच औद्योगिक विद्युत ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे या उपकेंद्रामुळे विद्युत ग्राहकांना योग्य दाबाने व अखंडित वीजपुरवठा मिळणार आहे.

सद्यस्थितीत महाराष्ट्रात विविध ठिकाणी महापारेषणच्या प्रकल्प उभारणीचे काम वेगाने सुरू आहे. विद्युत प्रकल्प उभारणीत परवानाधारक पारेषण कंपनींना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. त्यामुळे वीजप्रकल्प उभारणीची कामे निर्धारित कालावधीत पूर्ण होत नाहीत. वीजवाहिनीच्या कामामध्ये येणाऱ्या अडचणीमध्ये विशेष करून संबंधित जमीनधारकांकडून होणारा विरोध व त्या अनुषंगाने न्यायालयीन प्रकरणे, वनविभागाची परवानगी, रेल्वे क्रॉसिंगची परवानगी, महामार्ग विभागाची परवानगी, आदी अडचणींमुळे प्रकल्पांचे काम संथगतीने होतात.

परंतु, महापारेषणचे संचालक (प्रकल्प) श्री. अविनाश निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. सतीश अणे यांच्या नेतृत्वात त्यांच्या चमूने २२० के.व्ही. पाचगाव उपकेंद्र व वाहिनीचे काम कार्यपूर्ती कालावधीच्या तब्बल ८ महिन्याआधी पूर्ण करून नवा रेकॉर्ड केला आहे.



प्रकल्पाचे कंत्राट कार्यादेश दि. २६ फेब्रुवारी २०२४ अन्वये मे. प्रकाश इलेक्ट्रिकल्स इंजिनिअरिंग कार्पोरेशन, रत्नागिरी या कंपनीला देण्यात आले होते. या प्रकल्पाचे काम दि. ११.०४.२०२६ पर्यंत पूर्ण करावयाचे होते. परंतु, अतिउच्च दाब प्रकल्प प्रविभाग नागपूरचे अधीक्षक अभियंता श्री. जयवंत कोकाटे यांच्या नेतृत्वाखाली कार्यकारी अभियंता (प्रकल्प) श्री. जयेश कोल्हे आणि श्री. संजय वाढवे यांच्या सूक्ष्म नियोजनामुळे सदर प्रकल्प दि. १६ ऑगस्ट २०२५ रोजी म्हणजे तब्बल ८ महिन्याआधी पूर्ण करून कार्यान्वित होऊ शकला.

उपकेंद्र कार्यान्वित करण्यासाठी अधीक्षक अभियंता (स्थापत्य) श्री. प्रविणकुमार दामके, श्री. निशित किरोलीकर, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) श्री. अनिल सावरकर, श्री. भूषण खांडेकर यांनी परिश्रम घेतले.

याप्रसंगी महापारेषणचे संचालक (प्रकल्प) श्री. अविनाश निंबाळकर यांच्या हस्ते प्रकल्पाचे कंत्राटदार मे. प्रकाश इलेक्ट्रिकल्स इंजिनिअरिंग कार्पोरेशनचे संचालक श्री. प्रकाश देशमुख यांचा सत्कार करण्यात आला.

**महापारेषणचे नावीन्यपूर्ण उपक्रम : डॉ. संजीव कुमार**

संभाव्य विजेची वाढती मागणी लक्षात घेता महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीने (महापारेषण) अति उच्च दाब प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी विविध उपाययोजना आणि नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेतले आहेत. त्यामध्ये सर्वेक्षण आणि अंमलबजावणी वेळेत आणि अचूक केल्यामुळे आता प्रकल्प वेळेत पूर्ण होत आहेत, असे महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी सांगितले.

**प्रकल्प वेळेत पूर्ण करणार : श्री. अविनाश निंबाळकर**

सध्या विजक्षेत्रात आमुलाग्र बदल होत आहेत. त्या दृष्टीने पॉवरग्रीडनंतर महापारेषण कंपनी २०० कोटींच्या वरील सर्व टी.बी.सी.बी. प्रकल्पामध्ये भाग घेऊन ते सर्व प्रकल्प वेळेत पूर्ण करणार असल्याचे महापारेषणचे संचालक (प्रकल्प) श्री. अविनाश निंबाळकर यांनी सांगितले.

# मिरज येथील शासकीय प्रौढ दिव्यांग प्रशिक्षण केंद्रात मोफत प्रवेश प्रक्रिया सुरु

**लातूर/प्रतिनिधी :** राज्य शासनाचे दिव्यांग कल्याण आयुक्तालय आणि सांगली जिल्हा परिषद अंतर्गत मिरज येथे कार्यरत शासकीय प्रौढ दिव्यांग प्रशिक्षण केंद्र व वसतिगृह ही प्रौढ दिव्यांगांसाठी मोफत प्रशिक्षण प्रदान करणारी पश्चिम महाराष्ट्रातील एकमेव शासकीय संस्था आहे. या संस्थेला महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबईची मान्यता असून, या संस्थेत सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी मोफत प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. मर्यादित जागांमुळे गरजू दिव्यांगांनी त्वरित संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेने केले आहे.

या संस्थेमध्ये सर्टिफिकेट इन कॉम्प्युटर ऑपरेशन विथ एम.एस. ऑफिस या अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी किमान आठवी पास, वयोमर्यादा १६ ते ४० वर्षे अशी पात्रता आहे. तसेच मोटार अँड आर्मेचर वायडिंग, सबमर्सिबल पंप सिंगल फेज अभ्यासक्रमासाठी किमान नववी पास, वयोमर्यादा १६ ते ४० वर्षे अशी पात्रता आवश्यक आहे. या प्रशिक्षणाचा कालावधी एक वर्षाचा असून, केवळ दिव्यांग मुलांनाच प्रवेश दिला जाईल. संस्थेत प्रशिक्षण कालावधीत मोफत निवास, जेवण आणि प्रशिक्षण, अद्ययावत संगणक कार्यशाळा, नेटवर्किंग आणि इंटरनेट सुविधा, भरपूर प्रॅक्टिकल्ससह व्यवसायाभिमुख प्रशिक्षण, अनुभवी आणि तज्ज्ञ मार्गदर्शक आदी सुविधा उपलब्ध आहेत.

प्रवेश अर्ज आणि माहितीपत्रक मोफत उपलब्ध असून, ते अधिक्षक, शासकीय प्रौढ दिव्यांग प्रशिक्षण केंद्र व वसतिगृह, टाकळी रोड, म्हेत्रे मळा, गोदड मळ्याजवळ, मिरज, ता. मिरज, जि. सांगली, पिनकोड ४१६४१० या पत्त्यावर पोस्टाद्वारे किंवा समक्ष मिळतील. यासाठी ०२३३-२२२२९०८ या दूरध्वनी क्रमांकावर किंवा ९९२२५७७५६१, ९५९५६६७९३६, ९३२५५५५९८१ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला, एसएससी मार्कशिट, अपंगत्व प्रमाणपत्र, आधार कार्ड, युडीआयडी कार्ड, अधिवास प्रमाणपत्र आणि उत्पन्नाचा दाखला यांच्या झेरॉक्स प्रती जोडाव्यात. पूर्ण भरलेले अर्ज संस्थेकडे समक्ष किंवा पोस्टाने पाठवावेत.

अर्ज प्राप्त झाल्यानंतर तज्ज्ञ समितीमार्फत मुलाखती घेऊन प्रवेश दिले जातील. प्रवेशासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. मर्यादित जागांमुळे गरजू दिव्यांगांनी या सुवर्ण संधीचा लाभ घेण्यासाठी त्वरित संपर्क साधावा. ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांनी आपल्या परिचयातील गरजू दिव्यांगांना या योजनेची माहिती द्यावी, असे आवाहन शासकीय प्रौढ दिव्यांग प्रशिक्षण केंद्र व वसतिगृह, मिरज येथील अधिक्षकांनी केले आहे.

# जीवनाचा सन्मान : आत्महत्या प्रतिबंधासाठी सामाजिक जाणीवेची गरज

दरवर्षी १० सप्टेंबर हा दिवस जगभरात 'जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन' म्हणून पाळला जातो. हा दिवस केवळ आत्महत्या या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी नसून, तिच्या मुळाशी असलेल्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि मानसिक घटकांवर चर्चा घडवून आणण्यासाठी असतो. आत्महत्या ही फक्त वैयक्तिक निर्णयाची परिणती नसून ती एका व्यापक सामाजिक परिस्थितीची उपज आहे, असा समाजशास्त्रीय दृष्टिकोन घेऊन पाहिले तर या समस्येची व्याप्ती आणि गांभीर्य अधिक स्पष्टपणे समजते. व्यक्तीला आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणारे घटक अनेक स्तरांवर कार्यरत असतात. त्यामध्ये कुटुंबातील नातेसंबंध, आर्थिक ओढाताण, सामाजिक दबाव, बेरोजगारी, मानसिक आरोग्याचा अभाव, सांस्कृतिक अपेक्षा, राजकीय अस्थिरता, आणि आधुनिक जीवनातील एकाकीपणा इत्यादी घटकांचा समावेश होऊ शकतो. त्यामुळे आत्महत्या प्रतिबंधाचा विचार करताना केवळ वैद्यकीय वा मानसोपचारक दृष्टिकोन पुरेसा ठरत नाही; त्यासाठी सामाजिक संरचना, सांस्कृतिक पद्धती आणि आर्थिक विषमता यांचाही सखोल विचार आवश्यक ठरतो.

मानवी इतिहासाचा अभ्यास केला तर आत्महत्या हा प्रसंग तसा नवीन नाही. प्राचीन काळापासून विविध समाजांमध्ये आत्महत्येकडे वेगवेगळ्या नजरेने पाहिले गेले आहे. कुठे ती पराक्रमाचे, त्यागाचे किंवा सन्मानाचे प्रतीक मानली गेली, तर कुठे ती पाप, दुर्बलता किंवा अपमानाचे लक्षण समजली गेली. मात्र आधुनिक समाजशास्त्र आत्महत्येकडे केवळ वैयक्तिक कृती म्हणून न पाहता, ती समाजातील विसंगती, तणाव आणि असमानतेचे परिणाम म्हणून विश्लेषित करते. फ्रेंच समाजशास्त्रज्ञ एमिल दुर्खीम यांनी आत्महत्येवर केलेला सखोल अभ्यास आजही मार्गदर्शक ठरतो. त्यांनी आत्महत्या ही वैयक्तिक घटना नसून सामाजिक घटना आहे, असे स्पष्ट केले आहे. समाजातील एकात्मता आणि नियंत्रणाच्या प्रमाणावर आत्महत्येचे प्रकार ठरतात, असे त्यांनी दाखवून दिले. व्यक्ती समाजाशी निगडित नातेसंबंधातून प्रेरणा, आधार आणि जीवनमूल्ये घेत असते. जेव्हा हे संबंध तुटतात, जेव्हा समाजाकडून आधाराऐवजी दडपण वाढते किंवा जेव्हा व्यक्ती समाजाच्या मुख्य प्रवाहातून बाहेर फेकली जाते, तेव्हा तिच्या जगण्याची आशा मंदावते. आत्महत्या म्हणजे त्या आशेचा अंत असतो. त्यामुळे आत्महत्येकडे फक्त मानसिक आरोग्याचा प्रश्न म्हणून न पाहता समाजाच्या व्यापक संदर्भात समजून घेणे आवश्यक आहे. एमिल दुर्खीम या समाजशास्त्रज्ञाने आत्महत्येचे समाजशास्त्रीय विश्लेषण करून हे दाखवून दिले की व्यक्तीच्या जीवनातील एकाकीपणा, समाजाशी असलेले तुटलेले नाते, मूल्यांचा गोंधळ किंवा अत्यधिक सामाजिक नियंत्रण या कारणांनी आत्महत्या घडते. त्याच्या अभ्यासामुळे हे लक्षात येते की आत्महत्या ही वैयक्तिक न राहता सामाजिक वास्तवाशी जोडलेली घटना आहे.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले तर आत्महत्येच्या मुळाशी 'सामाजिक संबंधांचा अभाव' हे एक महत्वाचे कारण आहे. आधुनिक काळात जरी तंत्रज्ञानाने आपल्याला जगाशी जोडले असले तरी प्रत्यक्ष मानवी नाती, संवाद आणि आधार यांचा अभाव वाढत चालला आहे. यामुळे लोक मानसिकदृष्ट्या कमकुवत होत आहेत. दुसरीकडे, समाजाने मानसिक आरोग्याकडे अद्यापही 'कलंकित' नजरेने पाहण्याची प्रवृत्ती कायम ठेवली आहे. एखादी व्यक्ती नैराश्यात आहे, तिला मानसोपचाराची गरज आहे, हे मान्य करण्याऐवजी तिला वेडसर, असामान्य समजले जाते. परिणामी लोक मदत घेण्याऐवजी शांतपणे वेदना सहन करत राहतात आणि टोकाचा निर्णय घेतात. आज जगात आणि भारतात आत्महत्येचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढताना दिसत आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार दरवर्षी सुमारे ८ लाखांहून अधिक लोक आत्महत्या करतात, म्हणजे दर ४० सेकंदाला एक व्यक्ती स्वतःचे जीवन संपवते. भारत या आकडेवारीत अग्रभागी आहे. आजच्या काळात आपण पाहतो की आत्महत्येच्या घटनांमध्ये प्रामुख्याने शेतकऱ्यांच्या आत्महत्या, विद्यार्थ्यांच्या आत्महत्या, बेरोजगार तरुणांच्या आत्महत्या आणि वृद्धांच्या आत्महत्या ही काही ठळक उदाहरणे आहेत. युवकांसाठी रोजगाराची असुरक्षितता, करिअरचा दबाव, नातेसंबंधातील ताणतणाव, पालक-समाजाच्या अपेक्षा या मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम करतात. शेतकऱ्यांच्या बाबतीत कर्जबाजारीपणा, शेतीतील अपयश, हवामानातील अनिश्चितता आणि शासकीय यंत्रणेकडून पुरेसा आधार न मिळणे ही कारणे आत्महत्येच्या मोठ्या प्रमाणावर जबाबदार ठरतात. विद्यार्थ्यांमध्ये अपयशाची भीती, स्पर्धात्मक वातावरण, पालकांचा दबाव आणि सामाजिक तुलना हे आत्महत्येला प्रवृत्त करणारे घटक ठरतात. तर वृद्धांमध्ये एकाकीपणा, सामाजिक उपेक्षा आणि शारीरिक आजारपण यामुळे जीवननिराशा निर्माण होते.

महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा अशा भागात शेतकरी आत्महत्यांचा प्रश्न गेल्या दोन दशकांत सामाजिक आणि राजकीय चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे. पिकाला योग्य भाव न मिळणे, कर्जाचा बोजा, पावसाचे अनिश्चित चक्र, शेतीवरील वाढलेला खर्च, आणि कुटुंबाच्या जबाबदाऱ्यांचा ताण यामुळे शेतकरी अडचणीत येतात. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहिले तर हे केवळ वैयक्तिक असमर्थतेचे प्रकरण नसून कृषी धोरणातील त्रुटी, आर्थिक विषमता आणि ग्रामीण समाजाच्या सामाजिक-आर्थिक संरचनेतील असंतुलन यांचे द्योतक आहे. विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या घटना देखील तितक्याच वेदनादायी आहेत. शिक्षणातील स्पर्धा, पालकांची अपेक्षा, अपयशाची भीती, करिअरची असुरक्षितता यामुळे तरुण मनांना असह्य ताण सहन करावा लागतो. शैक्षणिक संस्थांमध्ये मानसिक आरोग्याचे प्रश्न गांभीर्याने घेतले जात नाहीत, हे एक मोठे कारण आहे. आत्महत्येच्या या घटनांवरून हे लक्षात येते की आपली शिक्षणव्यवस्था केवळ ज्ञानदानापुरती मर्यादित न राहता, विद्यार्थ्यांच्या मानसिक आणि सामाजिक आरोग्याकडे देखील लक्ष देणे आवश्यक आहे. शहरी भागातही आत्महत्येच्या घटना वाढत आहेत. महानगरांतील एकाकी जीवनशैली, सामाजिक नातेसंबंधांचा अभाव, कामाच्या ठिकाणी होणारा ताण, बेरोजगारी, कौटुंबिक विघटन, तणावपूर्ण नातेसंबंध आणि व्यसनाधीनता हे घटक आत्महत्येला कारणीभूत ठरत आहेत. विशेषतः तरुण आणि महिलांमध्ये या समस्येचे प्रमाण वाढलेले दिसते. समाजशास्त्रीय नजरेतून पाहिल्यास आधुनिकतेसोबत आलेली व्यक्तिवादी जीवनशैली, तुटलेली सामाजिक बंधने, परंपरागत आधारव्यवस्थेचे क्षरण आणि उपभोक्तावादी संस्कृतीमुळे निर्माण झालेली असुरक्षितता ही कारणे ठळकपणे समोर येतात.

स्त्रियांच्या आत्महत्यांचा विचार केला तर चित्र अधिक गुंतागुंतीचे दिसते. घरगुती हिंसा, हुंडा प्रथा, लैंगिक छळ, कौटुंबिक दडपशाही, आर्थिक स्वावलंबनाचा अभाव आणि समाजातील दुय्यम स्थान या कारणांमुळे स्त्रिया आत्महत्येस प्रवृत्त होतात. काही वेळा त्यांचे जीवन नियतीवादी आत्महत्येच्या चौकटीत बसते, कारण त्यांना त्यांच्या आयुष्यावर स्वतःचा ताबा असल्याची जाणीवच नसते. + समुदायातील आत्महत्या हाही एक प्रश्न आहे. सामाजिक स्वीकाराचा अभाव, तिरस्कार, बहिष्कार आणि भेदभाव यामुळे या गटात सुद्धा आत्महत्येचे होत आहेत. यावरून स्पष्ट होते की आत्महत्या ही समाजातील असमानता, दडपशाही आणि तुटकपणाची अभिव्यक्ती आहे. समाजशास्त्रीय दृष्टीने आत्महत्येचे विश्लेषण करताना सामाजिक नियंत्रण, सामाजिक ऐक्य, मूल्यव्यवस्था आणि आधारव्यवस्था या संकल्पना महत्त्वाच्या ठरतात. ज्या समाजात व्यक्तींना एकमेकांशी जोडणारे घटक मजबूत असतात, जिथे कुटुंब, समाजसंस्था आणि समुदाय आधार देतात, तिथे आत्महत्येचे प्रमाण कमी दिसते. उलट ज्या ठिकाणी व्यक्ती एकाकीपणात अडकतात, समाजाशी नाते तोडतात, किंवा मूल्यांमध्ये गोंधळ निर्माण होतो, तिथे आत्महत्येच्या घटना वाढतात. त्यामुळे आत्महत्या रोखण्यासाठी समाजात आपलेपणा, संवाद, सहकार्य आणि परस्पर जबाबदारीची भावना रुजवणे आवश्यक ठरते.



१० सप्टेंबर रोजी जगभरात पाळल्या जाणाऱ्या 'जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनाच्या' निमित्ताने केवळ वैद्यकीय उपचार किंवा समुपदेशन हाच उपाय नसून, व्यापक सामाजिक उपाययोजना आवश्यक आहेत. मानसिक आरोग्य सेवांचा विस्तार, समुपदेशन केंद्रे, हेल्पलाईन्स या उपक्रमांसोबतच शिक्षण, रोजगार, सामाजिक सुरक्षा, शेती धोरण, महिलांचे सक्षमीकरण, तरुणांच्या संधींची निर्मिती, नातेसंबंधातील संवाद यांसारख्या क्षेत्रांवर लक्ष देणे गरजेचे आहे. विशेषतः ग्रामीण समाजात आत्महत्येची कारणे सामाजिक-आर्थिक स्तरावर जास्त असतात, तर शहरी समाजात एकाकीपणा आणि ताण हे प्रमुख घटक असतात. त्यामुळे दोन्ही ठिकाणच्या वास्तवाला समजून घेऊनच प्रतिबंधात्मक धोरण आखणे आवश्यक आहे. आजच्या काळात माध्यमांची भूमिका देखील महत्वाची आहे. आत्महत्येच्या बातम्या कशा पद्धतीने दिल्या जातात यावर समाजाचे मानसशास्त्र परिणाम करते. जर अशा बातम्या सनसनाटी स्वरूपात दिल्या गेल्या, तर त्याचा विपरीत परिणाम होतो. उलट सकारात्मक उदाहरणे, संघर्षावर मात करणाऱ्या कथा, मानसिक आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणारे कार्यक्रम यांचा समाजावर चांगला परिणाम होतो. आत्महत्या ही समस्या केवळ व्यक्तीपुरती मर्यादित न ठेवता ती समाजाची सामूहिक जबाबदारी आहे, ही जाणीव माध्यमांनी सतत जागृत ठेवली पाहिजे.


आत्महत्या या समस्येवर उपाय शोधताना शासन आणि स्वयंसेवी संस्थांची भूमिकाही महत्त्वाची ठरते. आत्महत्या प्रतिबंधासाठी राष्ट्रीय आणि राज्य पातळीवर कार्यक्रम राबवणे, शाळा आणि महाविद्यालयांत मानसिक आरोग्य शिक्षणाचा समावेश करणे, रोजगाराच्या संधी निर्माण करणे, ग्रामीण भागात शाश्वत शेतीसाठी साहाय्य करणे, समाजातील दुर्बल घटकांना आधार देणे अशा अनेक स्तरांवर प्रयत्न करणे गरजेचे आहे. आत्महत्येचे मूळ कारण बहुआयामी आहे, त्यामुळे त्यावर उपाययोजना देखील बहुआयामी असायला हव्यात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता आत्महत्या ही एक सामाजिक आजार आहे, आणि तिचा प्रतिबंध हा केवळ वैद्यकीय प्रश्न नाही तर सामाजिक चळवळ आहे. व्यक्तीला एकटे न सोडता, त्याच्या वेदना आणि संघर्ष समजून घेतले, तर आत्महत्या टाळता येऊ शकते. समाजाने आत्महत्येकडे 'समस्या' म्हणून न पाहता, ती 'लक्षण' आहे हे ओळखले पाहिजे. हे लक्षण दुरुस्त करण्यासाठी समाजात समता, न्याय, आपलेपणा आणि सुरक्षिततेचे वातावरण तयार करणे गरजेचे आहे.

१० सप्टेंबर रोजी जगभरात पाळला जाणारा 'जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन' आपल्याला हीच जाणीव करून देतो की प्रत्येकाचे जीवन मौल्यवान आहे, आणि त्या जीवनाचा सन्मान करण्यासाठी आपण समाज म्हणून सजग राहिले पाहिजे. आत्महत्या हा मार्ग कधीच अंतिम उपाय नसतो. जीवन कितीही कठीण वाटले तरी समाजाच्या सामूहिक आधाराने, संवादाने, सहकार्याने आणि योग्य धोरणात्मक प्रयत्नांनी आपण जीवनाकडे नव्या दृष्टीने पाहू शकतो. हा दिवस म्हणजे फक्त स्मरणदिन नसून, आपल्या सामाजिक जबाबदारीची पुनःप्रत्ययकारी आठवण आहे. जर आपण सर्वांनी मिळून आत्महत्येची कारणे ओळखून, ती कमी करण्यासाठी हातभार लावला, तर निश्चितच 'जीवनाचा सन्मान' ही मूल्यव्यवस्था अधिक दृढ होईल. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून आत्महत्या रोखणे म्हणजे समाजाला अधिक संवेदनशील, न्याय्य आणि मानवी बनवणे होय.

**-डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
मो. क्र. ९९६०१०३५८२



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त



### अफगाणिस्तान – हाँगकाँग आमनेसामने; कोण मारणार बाजी?

नवी दिल्ली–आशिया कप २०२५ ची सुरुवात आजपासून सुरू होतेय. अबुधाबीच्या शेख झायेद स्टेडियमवर गट बी मधील महत्त्वाच्या सामन्यात अफगाणिस्तान आणि हाँगकाँग आमनेसामने येणार आहेत. गट बी मध्ये अफगाणिस्तान आणि हाँगकाँग यांच्यासह श्रीलंका आणि बांगलादेशच्या संघांचा समावेश आहे. शारजाह येथे नुकत्याच झालेल्या टी–२० तिरंगी मालिकेत पाकिस्तानकडून अंतिम सामन्यात पराभव स्वीकारल्यानंतर राशिद खानच्या नेतृत्वाखालील अफगाणिस्तान संघाला आपल्या चुका सुधारण्याचा शक्यता आहे. दुसरीकडं, हाँगकाँगला या सान्यात विजय मिळण्यासाठी संघर्ष करावा लागणार आहे, परंतु त्यांच्या सलामीवीर फलंदाजांनी चांगली कामगिरी केल्यास त्यांना पहिला गुलाल उधाण्याची शक्यता आहे.अफगाणिस्तान आणि हाँगकाँग यांच्यातील टी–२० आंतरराष्ट्रीय सामन्यांचा हेड–टू–हेड रेकॉर्ड खूपच रंजक आहे. दोन्ही संघ आतापर्यंत ५ वेळा टी–२० मध्ये एकमेकांविरुद्ध खेळले असून, यापैकी अफगाणिस्ताननं ३ सामने जिंकले, तर हाँगकाँगनं केवळ २ सामने जिंकले आहेत.




### रोहित शर्माची हॉस्पिटलवारी?

मुंबई–भारताचा वनडे कर्णधार रोहित शर्मा सोमवारी रात्री कोकिळाबेन हॉस्पिटलमध्ये दिसल्याने चाहत्यांच्या शंकाकुशंकांना उधाण आलं आहे. रोहित नेमका कोणत्या कारणासाठी हॉस्पिटलमध्ये दाखल झाला होता त्याचं कारण अद्यापही समजू शकलेले नाही. मात्र चाहत्यांनी रोहित शर्माला निरोगी राहण्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. टी२० आणि टेस्ट प्रकारातून निवृत्त झालेला रोहित शर्मा फक्त वनडे प्रकारात खेळतो. १९ ऑक्टोबर पासून सुरू होणाऱ्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेद्वारे रोहित संघात दिसणार आहे. यासाठी त्याचे चाहते आसुसलेले आहेत. मात्र हॉस्पिटलमधल्या व्हीडिओमुळे चाहत्यांच्या मनात धाकधूक वाढली आहे. रोहितने काही दिवसांपूर्वीच बंगळुरूस्थिती नॅशनल क्रिकेट अकादमीत फिटनेस टेस्ट दिली. या टेस्टमधील त्याच्या कामगिरीबाबत वैद्यकीय चमू समाधानी आहे. यामुळे ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेत तो खेळेल अशी खात्री चाहत्यांना आहे. आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीनंतर रोहित भारतासाठी खेळलेलाच नाही कारण त्याने टेस्ट आणि टी२० प्रकारातून निवृत्ती स्वीकारली आहे. रोहितच्याच नेतृत्वात भारतीय संघाने चॅम्पियन्स ट्रॉफीचं जेतेपद नावावर केलं होतं.भारतीय संघ इंग्लंड दौऱ्यासाठी रवाना होणार होता. रोहित त्या संघाचा भाग असेल अशी चिन्हं होती मात्र त्याआधीच रोहितने टेस्टमधून निवृत्तीचा निर्णय घेत चाहत्यांना धक्का दिला.

### आशिया कपच्या पत्रकार परिषदेतचे आक्रमकतेच्या मुद्यावरुन पहिली ठिणगी?

दुबई,९–आशिया कप स्पर्धेला आजपासून सुरुवात होणार आहे. या स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान एकाच गटात आहेत. भारताची पहिली मॅच उद्या संयुक्त अरब अमिरात विरुद्ध होणार आहे. तर, भारत आणि पाकिस्तान रविवारी १४ सप्टेंबरला आमने सामने येणार आहेत. भारताचं नेतृत्व सूर्यकुमार यादव करतोय. तर, पाकिस्ताननं या स्पर्धेसाठी नव्या कॅप्टनची निवड केली आहे. पाकिस्तानचा कॅप्टन सलमान आगा आहे. आशिया कप स्पर्धेतील सर्व कॅप्टची पत्रकार परिषद पार पडली. यावेळी सूर्यकुमार यादवच्या एका उत्तरावर सलमान आगाने कमेंट केली. यामुळे भारत पाकिस्तान सामन्याच्या संदर्भात उत्सुकता पत्रकार परिषदेपासून पाहायला मिळाली.सूर्यकुमार यादव ला पत्रकार परिषदेत एक प्रश्न विचारण्यात आला. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानचे राजकीय संबंध बिघडलेले आहेत. याचा मॅचवर काय परिणाम होईल का असं सूर्यकुमार यादवला विचारण्यात आलं.यावर सूर्यकुमार यादवनं उत्तर देताना म्हटलं टीम इंडिया जेव्हा मैदानात उतरते तेव्हा आक्रमकतेने मैदानात उतरते. सूर्यकुमार यादव म्हणाला की, आम्ही जेव्हा मैदानावर उतरतो तेव्हा आक्रमकतेसह येतो. तुम्ही आक्रमकतेशिवाय क्रिकेट खेळू शकत नाही. आम्ही उद्या मैदानावर कमबॅक करण्यासंदर्भात उत्साही असल्याचं सूर्यकुमार यादवनं म्हटलं.



**बीजिंगमधील जागतिक ॲथलेटिक्स कॉन्टिनेंटल टूरमध्ये महिलांच्या ३००० मीटर स्पर्धेत अंतिम रेषा ओलांडत महिला धावपटू.**

## अमेरिकन खुला टेनिस स्पर्धेत अल्काराजचे जेतेपद



न्यूयॉर्क : जागतिक क्रमवारीत दुसर्या क्रमांकावर असलेल्या कार्लोस अल्काराजने २०२५च्या यूएस ओपनच्या अंतिम फेरीत जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असलेल्या जॅनिक सिनरचा पराभव करून त्याचे सहावे ग्रँड स्लॅम विजेतेपद जिंकले. यासह त्याने सिनरकडून जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकाचा मुकुटही हिसकावून घेतला. अल्काराजने दुसर्यांदा यूएस ओपन विजेतेपद जिंकले, यापूर्वी त्याने २०२२ मध्ये ही ट्रॉफी जिंकली होती.

न्यूयॉर्कमध्ये खेळल्या गेलेल्या या अंतिम सामन्यात स्पॅनिश खेळाडू अल्काराजने शानदार सुरुवात केली आणि पहिला सेट ६–२ असा जिंकला. दुसर्या सेटमध्ये सिनरने पुनरागमन केले आणि ६–३ असा विजय मिळवला. तिसर्या सेटमध्ये अल्काराजने वर्चस्व गाजवले आणि फक्त एक गेम गमावत सेट ६–१ असा जिंकला. चौथ्या सेटमध्ये सिनरने जोरदार झुंज दिली, परंतु अल्काराजने ६–४ असा विजय मिळवला आणि विजेतेपद पटकावले.यूएस ओपनपूर्वी, दोन्ही खेळाडू सिनसिनाटी मास्टर्सच्या अंतिम फेरीतही एकमेकांसमोर आले होते. त्या सामन्यात, सिनेरला दुखापतीमुळे सामना अर्ध्यावर सोडावा लागला आणि अल्काराज चॅम्पियन ठरला.

ग्रँड स्लॅम तिसर्यांदा आमनेसामने

या वर्षीचा हा तिसरा ग्रँड स्लॅम फायनल होता ज्यामध्ये अल्काराज आणि सिनर एकमेकांसमोर आले. जूनमध्ये फ्रेंच ओपन फायनलमध्ये अल्काराजने विजय मिळवला, तर जुलैमध्ये विम्बल्डन फायनलमध्ये सिनरने अल्काराजचा पराभव केला. अल्काराझने उपांत्य फेरीत २४ वेळा ग्रँड स्लॅम विजेता नोवाक जोकोविचचा ६–४, ७–६(४), ६–२ असा पराभव केला. दुसरीकडे, सिनरने कॅनडाच्या फेलिक्स ऑगर–अलियासिमेचा ६–१, ३–६, ६–३, ६–४ असा पराभव करून अंतिम फेरी गाठली.

अल्काराज–सिनरने शेवटचे आठ ग्रँड स्लॅम जिंकले

अल्काराज आणि सिनर यांनी गेल्या आठ ग्रँड स्लॅम ट्रॉफी सामायिक केल्या आहेत. गेल्या १३ ग्रँड स्लॅम विजेत्यांपैकी १० विजेतेपदे या दोघांनी जिंकली आहेत. आतापर्यंत अल्काराजने ६ ग्रँड स्लॅम जिंकले आहेत आणि सिनरने ४ ग्रँड स्लॅम जिंकले आहेत.सिनेरने २०२४च्या यूएस ओपनपासून सलग पाचव्यांदा ग्रँड स्लॅम फायनलमध्ये प्रवेश केला आहे. तो एका वर्षात चारही ग्रँड स्लॅम फायनलमध्ये पोहोचणारा चौथा खेळाडू ठरला. त्याच्या आधी रॉड लेव्हर (१९६९), रॉजर फेडरर (२००६, २००७, २००८) आणि नोवाक जोकोविच (२०१५, २०२१, २०२३) यांनी ही कामगिरी केली आहे.

## पाकिस्तान नाही, तर ही टीम भारतासाठी सगळ्यात मोठा खतरा, आकडे पाहून सूर्याची झोप उडाली!

मुंबई–आशिया कप २०२५ ला युएईमध्ये सुरूवात झाली आहे. स्पर्धेमध्ये टीम इंडियाचा पहिला सामना बुधवारी युएईविरुद्ध होणार आहे. ग्रुप ए मध्ये असलेली टीम इंडिया आशिया कप जिंकण्याची प्रबळ दावेदार मानली जात आहे, पण स्पर्धेत पाकिस्तान नाही तर एक टीम भारतासाठी सगळ्यात मोठा धोका ठरू शकते. आशिया कपमधले या टीमचे आकडेही पाकिस्तानपेक्षा चांगले आहेत.

आशिया कपमध्ये एकूण ८ टीम सहभागी झाल्या आहेत. या ८ टीमना दोन ग्रुपमध्ये विभागण्यात आलं आहे. ग्रुप ए मध्ये भारत, पाकिस्तान, युएई आणि ओमान या टीम आहेत. तर ग्रुप बी मध्ये अफगाणिस्तान, श्रीलंका, हाँगकाँग आणि बांगलादेश आहेत, त्यामुळे ग्रुप बी ला ग्रुप ऑफ डेथ म्हणूनही बोललं जात आहे.



आशिया कपमध्ये भारतासाठी श्रीलंकेची टीम मोठा धोका ठरू शकते. आशिया कपच्या इतिहासामध्ये भारत आणि श्रीलंका यांच्यात २३ मॅच झाल्या आहेत, यापैकी १२ सामन्यांमध्ये भारताचा आणि ११ सामन्यांमध्ये श्रीलंकेचा विजय झाला आहे. यंदाच्या आशिया कपमध्ये श्रीलंकेच्या टीमचा मुख्य प्रशिक्षक सनथ जयसूर्या आहे, त्यामुळे त्याच्या अनुभवाचाही त्यांना फायदा होऊ शकतो. श्रीलंकेची टीम भारताच्या ग्रुपमध्ये नसल्यामुळे भारत आणि श्रीलंका यांच्यात थेट सुपर–४ मध्येच सामना होण्याची शक्यता आहे.

आशिया कपमध्ये भारताने पाकिस्तानविरुद्ध १० मॅच जिंकल्या आहेत, तर ६ सामन्यांमध्ये त्यांचा पराभव झाला आहे. बांगलादेशविरुद्ध टीम इंडियाने १३ मॅच जिंकल्या आणि २ सामन्यांमध्ये भारताला पराभवाचा सामना करावा लागला. ग्रुप स्टेजमध्ये टीम इंडियाचे सामने युएई, पाकिस्तान आणि ओमानविरुद्ध होणार आहेत.



**इटलीच्या मिलानजवळील मोंझा येथील ऑटोड्रोमो नाझिओनाले मोंझा येथे २०२५ फॉर्म्युला वन इटालियन ग्रां प्रीमध्ये विजय साजरा करताना रेड बुल रेसिंगमधील डच ड्रायव्हर मॅक्स व्हर्स्टापेन.**

## जागतिक मुष्टियोध्दा चॅम्पियनशिप स्पर्धेत लक्ष्य चाहर उपांत्यपूर्व फेरीत

नवी दिल्ली : लिव्हरपूलमध्ये सुरू असलेल्या जागतिक बॉक्सिंग चॅम्पियनशिप २०२५ मध्ये भारताच्या खेळाडूंनी चांगली कामगिरी सुरूच ठेवली आहे. लक्ष्य चाहरने पुरुषांच्या ८० किलो वजनी गटात प्री–क्वार्टरफायनल (१६ राउंड) गाठली आहे, तर जास्मिनने महिलांच्या ५७ किलो वजनी गटात क्वार्टरफायनलमध्ये स्थान मिळवले आहे.

लक्ष्य चाहरने पुरुषांच्या ८० किलो वजनी गटात शानदार कामगिरी केली आणि जॉर्डनच्या हुसेन इशायशचा ५–० असा पराभव केला. त्याने सामन्याची आक्रमक सुरुवात केली आणि पहिल्या फेरीत आघाडी घेतली.

हुसेनने दुसर्या फेरीत पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला, परंतु लक्ष्यने तिसर्या फेरीत पुन्हा वर्चस्व गाजवले आणि शानदार विजय नोंदवला. पाचही न्यायाधीशांनी लक्ष्यच्या बाजूने एकमताने निर्णय दिला.महिलांच्या ५७ किलो वजनी गटात, जास्मिनने ब्राझीलच्या ज्युसिलिन सेर्केरा रोमेयूचा ५–० असा पराभव करून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.



पवन बटवालचा प्रवास संपला

पुरुषांच्या ५५ किलो वजनी गटात भारताच्या पवन बर्टवालला उझबेकिस्तानच्या मिर्झाखालोलोव्ह मिराझिझबेककडून ०–५ असा पराभव पत्करावा लागला. यासोबतच त्याचा जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील प्रवास येथेच संपला.

लव्हलिना बोरगोहेन बाहेर

टोकियो ऑलिंपिकमधील कांस्यपदक विजेती लव्हलिना बोरगोहेन पहिल्याच फेरीत बाहेर पडली. महिलांच्या ७५ किलो वजनी गटात तिला तुर्कीच्या बुसरा इसिलदारने ५–० असा पराभव पत्करावा लागला. पराभवानंतर २७ वर्षीय लव्हलिना म्हणाली की, तिला योग्य प्रशिक्षण आणि प्रशिक्षण मिळत नव्हते. सुमारे एक महिन्यापूर्वी तिने बीएफआयच्या एका वरिष्ठ अधिकार्यावरही गैरवर्तनाचा आरोप केला होता.

निखतचे दमदार पुनरागमन

५१ किलो वजनी गटात बिगरमानांकित निखत जरीनने दुखापतीतून सावरल्यानंतर शानदार पुनरागमन केले. तिने ३२व्या फेरीत अमेरिकेच्या जेनिफर लोझानोचा ५–० असा पराभव केला. २९ वर्षीय निखतने सावधपणे सामन्याची सुरुवात केली आणि संपूर्ण सामन्यात नियंत्रण राखले. आता प्री–क्वार्टरफायनलमध्ये तिचा सामना जपानच्या युना निशिनाकाशी होईल.

## पंजाबकडून खेळताना मानसिक त्रास झाला : गेल

बंगळुरू : आयपीएलमध्ये पंजाब किंग्जकडून खेळताना मला वाईट वागणूक देण्यात आली. लीगमध्ये एक वरिष्ठ खेळाडू असूनही, मला नवीन खेळाडूसारखे वागवले गेले. असा खुलासा वेस्ट इंडिजचा अनुभवी फलंदाज ख्रिस गेलने केला आहे.आयपीएलचा दिग्गज खेळाडू गेलने यूट्यूबवरील पॉडकास्टमध्ये त्याच्या आयपीएल कारकिर्दीबद्दल सांगितले. तो म्हणाला की, संघाचा कर्णधार राहुलनेही मला हाताळण्याचा प्रयत्न केला, पण मी नैराश्यात जाऊ लागलो.



गेल म्हणाला, 'पंजाबमध्ये मला एका वरिष्ठ खेळाडूप्रमाणे वागवले गेले नाही. आयुष्यात पहिल्यांदाच मी नैराश्यात जाऊ लागलो. अनिल कुंबळे (प्रशिक्षक) शी बोलताना माझ्या डोळ्यात अश्रू आले. मी त्याच्या कामावर आणि फ्रँचायझीच्या पद्धतींवर खूप नाराज होतो.'गेल पुढे म्हणाला, 'पंजाबचा कर्णधार केएल राहुलने मला सांत्वन देण्याचा प्रयत्न केला. तो म्हणाला, ख्रिस थांब, तू पुढचा सामना खेळशील, पण मी फक्त म्हटले, तुला भविष्यासाठी शुभेच्छा. मग मी माझ्या बॅगा पॅक केल्या आणि तिथून निघालो.'

गिलने पंजाबकडून ४ हंगाम खेळले

गेलने २००९ मध्ये कोलकाता नाईट रायडर्सकडून आयपीएलमध्ये पदार्पण केले. २ हंगाम खेळल्यानंतर, २०११ मध्ये त्याला रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने खरेदी केले. त्याने आरसीबीमध्ये सर्वाधिक काळ घालवला आणि त्याच्या संघाला दोनदा अंतिम फेरीतही नेले. त्याने बंगळुरूकडून ५ शतके झळकावली आणि आयपीएलमध्ये सर्वाधिक वैयक्तिक १७५ धावा केल्या.

## धोनीमुळे मी गिरगिट झालो होतो..., दिनेश कार्तिक माही बद्दल असे का म्हणाला?

नवी दिल्ली–भारतीय संघाचा माजी विकेटकीपर–फलंदाज दिनेश कार्तिक याने माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनीबाबत मोठे वक्तव्य केले आहे. कार्तिकने सांगितले की, धोनी संघात आल्यानंतर त्याला सतत आपला खेळ बदलावा लागला. वेगवेगळ्या भूमिका स्वीकारत तो संघात परत येण्याचा प्रयत्न करत राहिला. कार्तिकने कबुल केले की, धोनी आल्यावर त्याचे स्थान जवळजवळ संपले होते. त्याचा डेब्यू धोनीच्या आधी झाला असला, तरी धोनीने येताच विकेटकीपर म्हणून स्वत:चं वर्चस्व निर्माण केले. पुढे तो संघाचा कर्णधार बनला आणि भारताला तीन आयसीसी ट्रॉफी जिंकून दिल्या.

धोनीच्या कार्याबद्दल चर्चा

कार्तिकने सांगितले की, ''केनियाविरुद्धच्या ए टीम मालिकेत धोनीची बॅटिंग पाहून सर्वजण थक्क झाले होते. त्याने ज्या ताकदीने चेंडू सीमारेषेपलीकडे पाठवले ते पूर्वी कुणी पाहिले नव्हते. काही जण तर त्याची तुलना गॅरी सोबर्सशी करत होते.''

धोनीमुळे संघात परतण्यासाठी कार्तिकला स्वत:ला बदलावे लागले. तो म्हणाला, ''मी गिरगिटासारखा वागत होतो. जेव्हा ओपनिंगची जागा रिकामी असे, तेव्हा मी राज्य क्रिकेटमध्ये ओपनिंग करण्याची विनंती करायचो.

## सिराजला आयसीसी प्लेअर ऑफ द मंथ पुरस्कारासाठी नामांकन

दुबई : वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराज याला ऑगस्ट महिन्याच्या आयसीसी प्लेअर ऑफ द मंथ पुरस्कारासाठी नामांकन मिळाले आहे. त्याच्या व्यतिरिक्त न्यूझीलंडचा मॅट हेन्री आणि वेस्ट इंडिजचा जायडेन सील्स यांनाही नामांकन मिळाले आहे.इंग्लंडविरुद्धच्या ओव्हल कसोटीत त्याच्या दमदार कामगिरीसाठी सिराजला हे नामांकन मिळाले आहे. त्याने शेवटच्या डावात ५ विकेट्स घेत भारताला ६ धावांनी रोमांचक विजय मिळवून दिला. या विजयासह, भारत २–१ ने पिछाडीवर असूनही मालिका बरोबरीत आणण्यात यशस्वी झाला.

या ५ सामन्यांच्या मालिकेत भारत आणि इंग्लंडमधील अनेक खेळाडू जखमी झाले होते, परंतु सिराज सलग ५ कसोटी सामन्यांमध्ये खेळला. एवढेच नाही तर २३ विकेट्स घेत तो सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. त्याने १८५.३ षटके गोलंदाजी केली.ऑगस्टमध्ये मोहम्मद सिराजने फक्त एकच कसोटी सामना खेळला, परंतु त्याच्या कामगिरीमुळे त्याला नामांकन मिळाले. इंग्लंडविरुद्ध



अँडरसन–तेंडुलकर ट्रॉफीच्या शेवटच्या कसोटीत त्याने एकूण ९ विकेट्स घेत भारताला विजय मिळवून दिला. जसप्रीत बुमराहच्या अनुपस्थितीत, सिराजने पूर्ण जोमाने आक्रमणाचे नेतृत्व केले. सिराजने पहिल्या डावात ४ आणि दुसर्या डावात ५ विकेट्स घेतल्या. त्याच्या शानदार कामगिरीमुळे भारताने ओव्हल कसोटी जिंकली आणि मालिका २–२ अशी बरोबरीत आणली. त्याला 'प्लेअर ऑफ द मॅच' म्हणून गौरवण्यात आले.

इतर २ स्पर्धकांची कामगिरी...

न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज मॅट हेन्रीने झिम्बाब्वेविरुद्धच्या २–० अशा कसोटी मालिकेत १६ बळी घेतले. पहिल्या कसोटीत त्याने ६/३९ आणि ३/५१ आणि दुसर्या कसोटीत ५/४० आणि २/१६ असे आकडे नोंदवले.वेस्ट इंडिजच्या जायडेन सील्सने ३४ वर्षांनंतर पाकिस्तानविरुद्ध एकदिवसीय मालिका जिंकण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्याने ३ सामन्यात १० बळी घेतले. शेवटच्या सामन्यात त्याने कारकिर्दीतील सर्वोत्तम ६/१८ अशी कामगिरी केली.

## देव तारी त्याला कोण मारी, या युक्तीप्रमाणे डॉ. अहंकारी यांनी देवदूत बनवून सरपंच स्वरूप धुमाळ यांचे प्राण वाचवले; डॉ. अहंकारी यांच्यावर संपूर्ण तालुक्यातून कौतुकांचा वर्षाव



**निलंगा/आयुब बागवान :** देव तारी त्याला कोण मारी, या युक्तीप्रमाणे डॉ. श्रीधर अहंकारी यांनी जिवापाड शर्यतीचे प्रयत्न करून शेडोळ येथील लोकनिर्वाचित लोकप्रिय सरपंच स्वरूप धुमाळ हे अगदी मृत्यूच्या जवळ गेले होते. मात्र डॉ. अहंकारी यांनी व त्यांच्या टीमने मृत्यूची झुंज देत असलेले लोकप्रिय सरपंच स्वरूप धुमाळ यांचे प्राण वाचवण्यात यशस्वी झाली असून. त्यांच्या या धाडसांचे संपूर्ण तालुका स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.

गेल्या पंधरा दिवसांपूर्वी शेडोळ येथील लोकप्रिय सरपंच स्वरूप धुमाळ यांना गावाकडून निलंग्याकडे येत असताना वाटेतच एक भयानक हृदयविकाराचा तीव्र झटका आला होता त्या झटक्यामध्येच धुमाळ हे बेसूद अवस्थेत असताना अवघ्या पाच मिनिटाच्या फरकाने त्यांना डॉ. अहंकारी यांच्या हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. डॉ. अहंकारी यांच्या अथक परिसर व त्यांच्या टीमने मृत्यूची झुंज देत असलेले लोकप्रिय सरपंच स्वरूप धुमाळ यांचे प्राण वाचवण्यात त्यांना खूप मोठे यश आले असून त्यांच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

धुमाळ यांना पुढील उपचारांसाठी लातूर येथील दुबे हॉस्पिटलमध्ये त्यांच्यावर उपचार करण्यात आले असून त्यांची तब्येत पूर्वपदावर आली असून ते गावी आल्यानंतर सरपंच स्वरूप धुमाळ यांच्या संपूर्ण परिवारासह तालुक्यातील सरपंच मित्र परिवाराच्यावतीने डॉ. अहंकारी यांचे व त्यांच्या संपूर्ण टीमचे धुमाळ परिवाराच्यावतीने भव्य सत्कार करून परिवाराने डॉक्टरांची कृतज्ञता व्यक्त करून जाहीर आभार मांडले. यात डॉ. श्रीधर अहंकारी, केशव बेंबडे, सुनील जाधव यांचा यावेळी भव्य सत्कार करण्यात आला.

या सत्कार सोहळ्याला जि प चे मा. सदस्य तथा चेअरमन व्यंकट आप्पा धुमाळ, सिंधी जवळग्याचे सरपंच अंगद सुरवसे, काटेजवळगा येथील सरपंच शरद सोमवंशी, योगेश सोळंके, साहेबराव हरणे, ऋतिक पवार, शंकर पेटकर, संतोष माळी, गणेश तूगावे, पत्रकार संघाचे सचिव झटिंग अण्णा म्हेत्रे, पत्रकार विशाल हलकीकर पत्रकार गोविंद सुरवसे, पत्रकार परमेश्वर शिंदे, पत्रकार अस्लम झारेकर, पत्रकार साजिद पटेल यांच्यासह शेकडो मित्रपरिवार या कृतज्ञ सोहळ्याला उपस्थित होते.

## दयानंद वाणिज्य महाविद्यालयात ‘‘इंडियन नॉलेज सिस्टीम‘‘ या विषयावर कार्यशाळा संपन्न; दोन सत्रात झाली कार्यशाळा; तज्ञ व्यक्तींचे लाभले मार्गदर्शन



**लातूर/प्रतिनिधी :**येथील दयानंद शिक्षण संस्थेअंतर्गत चालणाऱ्या दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या वतीने दि. ४ सप्टेंबर २०२५ रोजी इंडियन नॉलेज सिस्टीम या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत नवी दिल्ली येथील युजीसीच्या ट्रेनर तथा सिनेट सदस्य डॉ. नीता मोहिते या योगा दर्शन या विषयावर तर ठाण्याच्या आनंद विश्वा गुरुकुल विधी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य ऍड. सुयश प्रधान हे चॅलेंजेस इन प्रोटेक्टिंग ट्रॅडिशनल नॉलेज लिगॅली या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी आयोजक प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर होते. यावेळी मंचावर उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, कार्यशाळा समन्वयिका डॉ. कविता बियाणी, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण आदींची उपस्थिती होती. एकूण दोन सत्रात ही कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थी आणि प्राध्यापकांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. या कार्यशाळेत विविध महाविद्यालयातील प्राध्यापक या कार्यशाळेत सहभागी झाले होते. प्रथम सत्रात बोलताना डॉ. नीता मोहिते म्हणाल्या, योगाला फार मोठा इतिहास आहे. प्रत्येकाने योगा करायला हवा असे भगवदगितेत उल्लेखित केले आहे. भक्तीच्या मार्गाने आपण ईश्वरापर्यंत पोहोचू शकतो. ध्यान धारणा केल्यास मनाची एकाग्रता होते. अन्नाशिवाय माणूस राहू शकतो मात्र प्राणाशिवाय आपण जगू शकत नाही. त्यासाठी योगा प्राणायाम करणे आवश्यक आहे. ताण तणाव कमी करण्यासाठी योगासने अत्यंत गरजेची आहेत. भारतातला योगा हा आता वैश्विक झाला आहे, असेही त्या म्हणाल्या. प्रथम सत्राचे सूत्रसंचालन डॉ. आकांक्षा भांजी यांनी तर आभार प्रा. लता जाधव यांनी मानले. द्वितीय सत्रात ऍड.प्रधान यांनी मार्गदर्शन केले

# रामेश्वर रुई येथील एकमेवाद्वितीय मानवतातीर्थ भवनाचे महाद्वार व पवनपूत्र श्री हनुमान मूर्तीची स्थापना

### विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या संकल्पनेतून साकार

**लातूर/प्रतिनिधी :** रामेश्वर रुई या गावाचे नुकतेच ‘विश्वधर्मी मानवतातीर्थ’ असे नामकरण झाले. त्याचेच पुढचे पाऊल म्हणजे ‘विश्वधर्मी मानवतातीर्थ भवन’ या वास्तूची निर्मिती होय. विश्व शांती केंद्र आळंदी, माईर्स एमआयटी, पुणे भारत तर्फे या भवनाचा लोकार्पण सोहळा ५, ६ आणि ७ ऑक्टोबर रोजी विश्वधर्मी मानवता तीर्थ रामेश्वर रुई येथे होणार आहे. यावेळी देशभरातील विविध धर्मांचे मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहतील.

त्याची पूर्व तयारी या ‘विश्वधर्मी मानवता तीर्थ भवन’ च्या ऐतिहासिक स्वरूपाचे संपूर्ण नक्षीदार लाकडी बांधकाम उभारण्याचा कार्यक्रम तसेच सदरील भवनाच्या आवारात पवनपुत्र श्री हनुमान यांचा भव्य व देखणा ११ फूट उंचीचा पुतळा स्थापन करण्याचे काम नुकतेच संपन्न झाले.

यावेळी विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड, सौ. उषा विश्वनाथ कराड, रामेश्वर-रुईचे माजी सरपंच तुळशीराम दा कराड, काशीनाथ दा कराड, राजेश कराड आणि पंचक्रोशितील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदरील ‘ विश्वधर्मी मानवता तीर्थ भवनात’ विविध धर्माचे संस्थापक, जगाच्या इतिहासातील मान्यवर संत, सज्जन, वैज्ञानिक, विचारवंत, दार्शनिक यांचे सचित्र दर्शन माहितीद्वारे भवन सजविण्यात येऊन जगाला शांती व मानवतेचा संदेश देण्याचे कार्य करण्यात येणार आहे.

यावेळी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले,‘‘ महाराष्ट्रातील मराठवाड्यातील रामेश्वर रुई हे गांव यज्ञभूमी म्हणून परिचित आहे. याच गावातील हिंदू मुस्लिम बांधवांनी एकत्र येऊन जवळपास २७५ वर्षापूर्वी उध्वस्त केलेले श्रीराम मंदिर व सुमारे ६३ वर्षापूर्वी उध्वस्त करण्यात आलेली जामा मस्जिद व ख्याजा जैनुद्दिन चिश्ती दर्गा यांची पुनर्बांधणी केली. भारताच्या इतिहासातील सांप्रदायिक सद्भावनेचे हे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. त्याचबरोबर तथागत भगवान गौतम बुद्ध विहार व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती भवन यांची उभारणी केली आहे. अशा ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक अशा विविध उपक्रमांमुळे हे गाव खऱ्या अर्थाने मानवतातीर्थ म्हणून जागतिक स्तरावर उदयास आले आहे.’’

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची १५६वीं तसेच भारताचे दुसरे पंतप्रधान व साधी राहणी व उच्च विचार सरणी याचे मुर्तीमंत प्रतिक असलेले भारतरत्न श्री लाल बहादुर शास्त्री यांची १०१वीं जयंती याचे औचित्य साधून सदरील विश्वशांती मानवता तीर्थ भवनाचे लोकार्पण योजण्यात आले आहे.

पंचक्रोशितील नागरिकांनी विविध सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक उपक्रमांसाठी राष्ट्रीय ऐक्याचे प्रतिक असणाऱ्या या भवनाचा सदूउपयोग करावा, असे आवाहन डॉ. कराड यांनी केले.



## माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी बाभळगाव निवासस्थानी घेतली नागरिकांची भेट



**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी मंगळवार, ९ सप्टेंबर रोजी सकाळी बाभळगाव येथील निवासस्थानी लातूर शहर व जिल्हाभरातून आलेल्या नागरिकांची भेट घेतली. यावेळी त्यांनी विविध संस्था, संघटना, तसेच काँग्रेस व महाविकास आघाडी मित्रपक्षांच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधला. उपस्थित नागरिकांच्या अडीअडचणी आणि समस्या त्यांनी शांतपणे ऐकून घेतल्या. निवेदने व निमंत्रणे स्वीकारून त्यावर तातडीने पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांनी संबंधितांना दिल्या.

यावेळी माजी महापौर दीपक सुळ, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचिव समद पटेल, सचिव कल्याण पाटील, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, रेणा सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन सर्जेराव मोरे, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे व्हाईस चेअरमन प्रमोद जाधव, तसेच इतर अनेक पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी बाभळगाव येथील तंटामुक्ती समितीच्या नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. अध्यक्षपदी निवड झालेले महादेव देशमुख आणि उपाध्यक्षपदी निवड झालेले धनराज मस्के यांना पुढील कार्यासाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी बाभळगावचे उपसरपंच गोविंद देशमुख, संतोष देशमुख, नवनाथ मस्के आदी उपस्थित होते.

## शिक्षक हाच समाजाचा आधारस्तंभ : डॉ. जगदाळे



**लातूर/प्रतिनिधी :**काळ कितीही बदलला तरी शिक्षक हाच समाजाचा खरा आधारस्तंभ असतो, असे प्रतिपादन राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त डॉ. संदीपान जगदाळे यांनी दयानंद वाणिज्य महाविद्यालयात शिक्षक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात केले. दयानंद वाणिज्य महाविद्यालयात शिक्षक दिनानिमित्त डॉ. संदीपान जगदाळे यांचे व्याख्यान आयोजित केले होते. यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर होते. उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, आयक्यूएसी समन्वयक डॉ. बी.टी. चव्हाण, बीसीए विभाग प्रमुख प्रा.एस.व्ही स्वामी, बीबीए विभाग प्रमुख डॉ वैशाली सातपुते आदींची मंचावर उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. जगदाळे म्हणाले, विद्यार्थ्यांनी परिस्थितीवर मात करायला शिकले पाहिजे. जेवढा संघर्ष मोठा तेवढे यश मोठे असते, असे सांगून आपल्या आयुष्यातील संघर्षाची माहिती त्यांनी विद्यार्थ्यांसमोर मांडली. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सर्व शिक्षकांचा आदरपूर्वक सन्मान करून शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. प्रास्ताविक तौफिक शेख यांनी सूत्रसंचालन सृष्टी द्विवेदी आणि विद्या सूर्यवंशी यांनी केले तर शेवटी आभार आफशा शाह यांनी मानले. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रशांत सूर्यवंशी, ज्ञानेश्वर कोल्हे, सायली शेळके यांनी प्रयत्न केले.

## विकसित भारत संकल्पना पूर्ण होण्यासाठी युवकांची गरज- डॉ. अशोक महाजन

**निलंगा/आयुब बागवान :** देशाच्या विकासामध्ये युवकांचा वाटा मोठा असतो. विविध शाखांमध्ये पदवीधर झालेल्या विद्यार्थ्यांनी देशाच्या विकासामध्ये हातभार लावला पाहिजे. पदवीधारकांना पदवी प्राप्त झाली येथूनच त्यांच्या स्पर्धेला खरी सुरुवात झाली आहे. या स्पर्धेच्या युगात पदवीधारकांनी आपल्या क्षमतेचा वापर पूर्णपणे करावा आणि ध्येय साध्य करावे. आपले ध्येय आपली क्षमता ओळखून ठरवा आणि यशस्वी व्हा. संशोधनाकडे अधिक लक्ष द्या ‘‘विकसित भारत‘‘ ही संकल्पना आपल्याला पूर्ण करायची असेल तर युवकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. असे मत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्र.कुलगुरू डॉ.अशोक महाजन यांनी व्यक्त केले. ते निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालय व महाराष्ट्र कॉलेज ऑफ फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभात बोलत होते. शिक्षणाची जाणीव, शिक्षणाचे महत्त्व खेड्यापाड्यापर्यंत पोहोचले पाहिजे. शिक्षणाचा पाया अधिक भक्कम झाला पाहिजे याच विचाराने प्राथमिक आणि माध्यमिक शाळांकडे स्व. डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांनी लक्ष दिले होते. एका पिढीने मोठ्या कष्टाने उभे केलेले शैक्षणिक संकुल दुसऱ्या पिढीने मोठ्या ताकतीने पुढे नेले पाहिजे, जे काम श्री.विजय पाटील निलंगेकर करीत आहेत याबद्दल प्रमुख पाहुणे जेष्ठ पत्रकार डॉ. विजय चोरमारे यांनी समाधान व्यक्त केले.

या पदवी प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष श्री. विजय पाटील निलंगेकर यांची उपस्थिती होती. आपल्या अध्यक्षीय समारोपात त्यांनी, बदलत्या काळात शिक्षण क्षेत्रात झालेल्या बदलांना डोळ्यासमोर ठेवून अभ्यासक्रम निर्माण झाले पाहिजेत. पदवीप्राप्त विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय, संशोधन क्षेत्रात करताना देशाची आणि समाजाची प्रगती कशी होईल हा विचार करण्याचा सल्ला दिला.




स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेस अभिवादन करून दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.या आनंदमय पदवी प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमाप्रसंगी कला, विज्ञान, वाणिज्य, संगणकशास्त्र, व्यवसायिक अभ्यासक्रम, फार्मसी अशा विविध शाखेतील २११ पदवीधारक विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.

यावेळी विचार मंचावर महाराष्ट्र शिक्षण समितीचे सचिव श्री. बब्रुवानजी सरतापे, महाराष्ट्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कर्मवीर कदम, महाराष्ट्र फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर पाटील, उपप्राचार्य डॉ. भास्कर गायकवाड, प्रा.प्रशांत गायकवाड, परीक्षा व मूल्यमापन विभागाचे प्रमुख डॉ. बालाजी गायकवाड, डॉ. चंद्रवदन पांचाळ, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, विद्यार्थी विकास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, क्रीडा, सांस्कृतिक या सर्व विभागाचे प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक परीक्षा व मूल्यमापन विभागाचे प्रमुख डॉ. बालाजी गायकवाड यांनी केले सूत्रसंचालन डॉ.गोविंद शिवशेटे, डॉ. नंदा भालके, प्रा. संदीप सूर्यवंशी, यांनी केले. तर आभार विद्यार्थी विकास विभागाचे प्रमुख डॉ. हंसराज भोसले यांनी मानले.

## राज्यस्तरीय वक्तृत्व व वादविवाद स्पर्धांसाठी दयानंद कला महाविद्यालय सज्ज

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद कला महाविद्यालय, लातूर व शिक्षणाधिकारी (योजना) कार्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने उल्हास नवभारत साक्षरता उपक्रमांतर्गत राज्यस्तरीय वक्तृत्व व वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा बुधवार, १० सप्टेंबर २०२५ रोजी महाविद्यालयाच्या सभागृहात सकाळी ११ वाजता होणार आहे.

या स्पर्धेचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे.




या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवावा असे आवाहन उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, डॉ. दिलीप नागरगोजे व पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित यांनी केले आहे. सदरील स्पर्धाही राज्यभरातील इयत्ता अकरावी व बारावीचे विद्यार्थ्यांसाठी असून. संबंध महाराष्ट्रातून अनेक विद्यार्थी नोंदणी करून सहभागी झाले आहेत. विद्यार्थ्यांमधील वक्तृत्व कौशल्य आणि वादविवादातून विचारमंथनाची क्षमता वाढविण्याच्या उद्देशाने ही स्पर्धा घेण्यात येत आहे.

या स्पर्धेच्या उद्घाटक म्हणून शिक्षणाधिकारी (योजना) सौ. तृप्ती अंधारे उपस्थित राहणार आहेत. इंग्रजी, मराठी व हिंदी भाषेतील जाणकार परीक्षक मंडळी विद्यार्थ्यांचे परीक्षण अत्यंत पारदर्शकपणे करणार आहेत.

या वक्तृत्व व वादविवाद स्पर्धेचे प्रमुख डॉ. गोपाल बाहेती आणि डॉ. सुधीर गाडवे स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.

शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# आंतरझोन वेटलिफ्टिंग स्पर्धेत दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीला गोल्ड मेडल




**लातूर/प्रतिनिधी :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर यांच्या सौजन्याने दयानंद इनडोअर स्टेडियम येथे अंतरझोन वेटलिफ्टिंग मुले व मुली स्पर्धा संपन्न झाल्या या स्पर्धेत दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, लातूर. मुलींच्या स्पर्धेत द्वितीय वर्षातील वैष्णवी स्वामी हिने विद्यापीठात गोल्ड मेडल, आणि अंतिम वर्षातील अमृता क्षीरसागर हिने सिल्वर मेडल तर सुप्रिया जोगदंडकार हिने ब्रॉन्झ पदक पटकाविले तर मुलांच्या स्पर्धेमध्ये तृतीय वर्षातील नावेद शेख याने सिल्वर मेडल पटकावले. विद्यापीठीय विभागीय स्तरावर मुलींच्या संघाने दयानंद इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी महाविद्यालयाला सर्व साधारण विजेतेपद दिले. या सर्व विद्यार्थ्यांना क्रीडाशिक्षक श्री. ऋषिकेश मस्के यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. लक्ष्मीरमणजी लाहोटी, उपाध्यक्ष मा. अरविंदजी सोनवणे, ललितभाई शहा, रमेशजी राठी, सचिव मा. रमेशजी बियाणी, संयुक्त सचिव मा. विशालजी लाहोटी, सहाय्यक सचिव मा. श्रीकांतजी उटगे, मा. अजिंक्यजी सोनवणे, कोषाध्यक्ष मा. संजयजी बोरा तसेच संस्थेचे सर्व मान्यवर पदाधिकारी यांनी विजयी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाजिद चाऊस, प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व सर्व विद्यार्थीयांनी स्पर्धकांचे कौतुक करून त्यांचे अभिनंदन केले.

# लातूर येथे ११ सप्टेंबर रोजी आयोजित 'जागेवरच निवड संधी' या मोहिमेअंतर्गत रोजगाराची संधी

**लातूर/प्रतिनिध ;**–जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व मॉडेल करिअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पंडीत दीनदयाल उपाध्याय जागेवरच निवड संधी अर्थात प्लेसमेंट ड्राईव्हचे ११ सप्टेंबर, २०२५ रोजी सकाळी १० वाजता लातूर येथील जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र येथे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमात नामांकित आस्थापना, उद्योजक सहभागी होणार आहेत. या आस्थापनेमध्ये दहावी, बारावी, कोणतीही पदवी, पदव्युत्तर पदवी, आय.टी.आय., डिप्लोमा, तसेच इतर शैक्षणिक पात्रतेच्या उमेदवारांना यामध्ये सहभागी होता येणार आहे.

इच्छुक उमेदवारांनी ११ सप्टेंबर, २०२५ रोजी सकाळी १० वाजता जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, शासकीय तंत्र प्रशाला केंद्र, जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालया समोर, लातूर येथे स्वखर्चाने मुलाखतीसाठी आवश्यक शैक्षणिक कागदपत्रे, स्वत:चा रिझ्युम, बायोडाटा, पासपोर्ट फोटो इत्यादीच्या पाच प्रतीसह उपस्थित रहावे, असे अवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त यांनी केले आहे.

# राष्ट्र सेवा दलाच्यावतीने बालक्रांतीवीर शहीद शिरीषकुमार यांना अभिवादन



**लातूर/प्रतिनिधी :** भारतीय स्वातंत्र्य लढ्यात वयाच्या १६ व्या वर्षी शहीद झालेल बाल क्रांतिवीर शहीद शिरीषकुमार यांच्या स्वातंत्र्य लढ्याचा वारसा जपला पाहिजे. असे आवाहन यशवंतराव चव्हाण विद्यानिकेतन शाळेचे अध्यक्ष अनिल वसंतराव काळे यांनी आज अध्यक्षीय समारोपात केले.

राष्ट्र सेवा दलाचे लातूर जिल्हाध्यक्ष पांडुरंग देडे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. लातूरच्या खाडगाव रोडवरील यशवंराव चव्हाण शाळेत आयोजित शहीद शिरीषकुमार यांच्या स्मृतिदिन कार्यक्रमात ते बोलत होते.

प्राचार्य अनिल काळे म्हणाले, सध्या देशातील वातावरण जातीयद्वेशाने कलुषित होत आहे. विद्यार्थ्यांनी सामाजिक परिवर्तन घडवण्यासाठी राष्ट्र सेवा दलाशिवाय पर्याय नाही. आणि ज्येष्ठाना सांगितले कीं, आजच्या मोबाईलच्या काळात प्रत्यक्ष मनोरंजनातून, सोप्या भाषेतून विद्यार्थ्यांवर लोकशाही, समाजवादी, धर्मनिरपेक्षता, अंधश्रद्धा विरोधी विचारांचे संस्कार करावे लागतील.

प्रमुख पाहुणे प्रा. सुभाष भिंगे म्हणाले, बालवीर शहीद शिरीषकुमार मेहता यांनी १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात आपल्या चार मित्रासाह देशासाठी आपल्या छातीवर ब्रिटिशांच्या गोळ्या झेलून प्राणाची आहुती दिली. त्यामुळं तुम्ही आम्ही हे स्वतंत्र्यं टिकवलं पाहिजे, त्यासाठी मुलांनी अभ्यास करावा, आई वडिलांना घरकामात मदत करावी, महात्मा गांधी व शिरीषकुमार यांचे स्वतंत्र लोकशाही राष्ट्राचे स्वप्न पूर्ण करणे ही काळाची गरज आहे. इतर मान्यवरांचीही भाषणे झाली.

यावेळी विजय चव्हाण, शिवाजीराव शिंदे, प्राचार्य डॉ. श्रीकांत गायकवाड, शिरीष दिवेकर, मुख्याध्द्यापक कमलाकर काळे, सेवा दलाचे माजी पूर्णवेळ कार्यकर्ते शिवाजी कांबळे, प्रा. निशिकांत देशपांडे, शाम जैन, गणेश गोमारे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी शाळेच्या विद्द्यार्थिनींनी स्वागतगीत गायले. त्यानंतर शिवाज कांबळे यांनी साथीयो सलाम है हे गीत सादर केले.

प्रस्ताविकात राष्ट्र सेवा दलाचे लातूर जिल्हाध्यक्ष पांडुरंग देडे यांनी बालक्रांतिवीर शिरीषकुमार यांचा इतिहास सांगून स्वातंत्र्य लढ्याचे महत्व विशद केले.

कार्यक्रमासाठी महादेव कांबळे, आदर्श शिक्षिका सुरेखा कांबळे आदि उपस्थित होते

निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

# आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण: जिल्हा परिषदेच्या शिक्षकांनी दर्जेदार शिक्षण देऊन विद्यार्थ्यांचे उज्वल भवितव्य घडवावे-आ. रमेशअप्पा कराड






**लातूर/प्रतिनिधी :** शिक्षण क्षेत्र पवित्र असले पाहिजे, जिल्हा परिषदेच्या शाळा या गोरगरिबाचे वैभव असून याच शाळेतून शिकलेले अनेकजण देशाच्या सर्वोच्च पदापर्यंत पोहोचले आहेत तेव्हा स्पर्धेच्या युगात जिल्हा परिषदेच्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देऊन त्यांचे उज्वल भवितव्य घडवावे असे प्रतिपादन लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी केले.

रेणापूर तालुका पंचायत समिती शिक्षण विभागाच्या वतीने २१ जणांना तालुका आदर्श शिक्षक पुरस्काराचे वितरण आणि विविध क्रीडा स्पर्धेतील सन्मान सोहळा आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते मंगळवारी रेणापूर पं.स. सभागृहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी गटविकास अधिकारी सुमित जाधव हे होते तर याप्रसंगी रेणापूरचे तहसीलदार सागर मुळीक, गटशिक्षणाधिकारी कृष्णा भराडीया, तालुका आरोग्य अधिकारी श्रीधर रेड्डी, भाजपाचे विक्रमकाका शिंदे, नवनाथ भोसले, अनिल भिसे, सतीश आंबेकर, दशरथ सरवदे, सिद्धेश्वर मामडगे, गोपाळ पडिले, संपत कराड, लक्ष्मण यादव, भाऊसाहेब गुळबिले, अनुसया फड, निवृत्ती लहाने आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती. चांगल्या कामाची पावती हिच मिळालेल्या पुरस्कारातून प्राप्त होते. सर्व पुरस्कार प्राप्त शिक्षकांचे अभिनंदन करून यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, देशाचे भवितव्य शिक्षकांच्या हाती असते विद्यार्थ्यांना कोणते संस्कार देणार त्यानुसार विद्यार्थी घडतात. आई-वडिलांपेक्षाही अधिक संस्कार करणारे शिक्षक हेच विद्यार्थ्यांच्या जीवनातील महत्त्वाचे गुरु असून ज्या घरात ज्या शाळेत चांगले संस्कार मिळतात त्या ठिकाणी निश्चितच प्रगती झाल्याशिवाय राहत नाही. तेव्हा शिक्षकांनी कर्तव्यात कसूर न करता, कष्ट, जिद्द आणि प्रामाणिकपणे कर्तव्य केल्यास निश्चितपणे चांगली पिढी घडल्याशिवाय राहत नाही असे बोलून दाखवले.

बऱ्याच शिक्षकांचे कार्य कौतुकास्पद आहे. अनेक ठिकाणी शिक्षक दोन आणि विद्यार्थी पाच अशी स्थिती आहे. ही परिस्थिती बदलावी लागेल. काही ठिकाणी शाळा बंद पडत आहेत यासाठी शिक्षकांनी आत्मपरीक्षण करण्याची गरज असून जिल्हा परिषद शाळेची गळती थांबली पाहिजे. शिक्षकाकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलला पाहीजे त्यासाठी शिक्षकांनी स्वतःला आचारसंहिता घालून कर्तव्यनिष्ठ काम करायला हवे. शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रासाठी जे जे लागेल ती मदत करण्यास आपण सदैव तयार आहोत असेही आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखवले.

रेणापूर तालुक्यातील गावागावातील प्रत्येक शैक्षणिक प्रगतीच्या कार्यात आ. रमेशआप्पा कराड सतत सहभागी असतात त्यांनी कर्मचारी खेळाडूंना प्रोत्साहन दिले मदत केली असे सांगून गटविकास अधिकारी सुमित जाधव यांनी रेणापूर पंचायत समितीच्या लोकाभिमुख कामकाजाची माहिती दिली. तर शिक्षक पतसंस्थेचे अध्यक्ष गोपाळ पडिले आणि पुरस्कार प्राप्त शिक्षक भाऊसाहेब भामरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन संतोष मोगरगे यांनी केले.

यावेळी आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते रेणापूर तालुक्यातील विद्या अंकुश, विजय माळी, अनिल राठोड भाग्यश्री चव्हाण, रंजना पुरी, कैलास कुरुंद, रमेश जगताप, यशवंत कोयाडे, शेख जाकीर, हनुमंत मुंडे, रावसाहेब भांबरे, शीला पलमटे, श्रीधर वांगे, हनुमंत सोळंके, अरुण चव्हाण, मालन त्रिमुखे, भागवत जाधवर, छाया सदाफुले, शिवाजी शिरसाट, आलिया बुऱ्हाण, शुभम कांबळे या शिक्षकांना आदर्श पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला तर कर्मचाऱ्यांच्या जिल्हास्तरीय ग्रामीण क्रीडा स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल कबड्डी आणि खो-खो संघांचा तसेच वैयक्तिक विविध स्पर्धेतील यशस्वी स्पर्धकांचा सत्कार करून गौरव करण्यात आला. कार्यक्रमास रेणापुर तालुक्यातील लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, आदर्श शिक्षक, त्यांचे कुटुंब, कर्मचारी अधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नेता दिवंगत ..

कसा भला वाटतो
नेता होता दिवंगत
गेल्यावरती कौतुक
करता अतिपारंगत

आधी टिका जहरी
आताबोले विसंगत
उक्ती कृति विभिन्न
कधी नाही सुसंगत

नसेआडवा विस्तव
म्हणे केली रे संगत
लपूनबसते वास्तव
खोटे हलके तरंगत

दोस्ती राहिली लांब
संबंधचालले खंगत
कुठेकाय गिळायले
कुत्री बसतात हुंगत

नसलेले गुण चिकटे
कैकविशेषणे अंगत
जिवंत असता नाती
सतत राहती दुभंगत

साचे बद्ध भाषणे ती
विशेषणेहीमुखोत्गत
फोटोसेशन पार पाडे
एकमेकांना बिलगत

मिडीयाचे लक्ष जावे
मग सूटे हळू अलगत
बातमी पक्की आणा
निघावेखात्रीबाळगत

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.


टोनर रिफिलिंग
फक्त ₹ ३००/-
मास्टर प्लेट ट्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE**

The Superintending Engineer (Parli Circle) on behalf of MSETCL (the Employer) invites online bids (SRM E-Tender) from reputed & registered Electrical Contractors on Mahatransco E-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in** for following work.

| Sr. No. | Particulars of works | SRM E-Tender No. | SRM E-Tender RFx No. |
|---|---|---|---|
| 01 | Augmentation of Transformation Capacity by Additional Transformer 132/33 kV, 1 X 50 MVA at 132kV S/stn Majalgaon Dist. Beed under EHV O&M Division, Beed & Augmentation of Transformer Capacity by Replacement of 132/33KV, 2x25MVA T/F by 132/33KV, 2x50MVA at 132kv Niwali ss under EHV O&M Division Latur. | **SE/EHVC/PV/ TS/2025-26/T-03 (4th call)** | **7000037444** |

For further details visit our Website **https://srmetender.mahatransco.in.**
**Contact Person:** The Executive Engineer(O) : Phone No. (02446)222076.
The undersigned reserves the rights to accept or reject any or all tenders without assigning any reasons thereof.
Sd/-
**Superintending Engineer,**
**EHV (O&M) Circle, Parli-V**

**NAME CORRECTION**

I Mrs. **JANABAI SANJAY SHINDE** Legally wedded spouse of GS-163681X L/H Adm Sanjay Ramrao Shinde (serving in GREF/ BRO) aged 55yrs. Date of birth-15 Jan 1970 Resident of Vill- Gunjarga Teh- Nilanga Dist- Latur State- Maharashtra Pin-413521 have corrected my name as **JANABAI SANJAY SHINDE** instead of Janabi Baliram Surayvansi Affidavit dated 29 Aug 2025 before Judicial Magistrate 1st Class Nilanga Tq Nilanga Maharashtra.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE**

The Executive Engineer (EHV O&M Division) on behalf of MSETCL (the Employer) invites online bids (SRM E-Tender) from reputed & registered Electrical Contractors on Mahatransco E-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in** for following work.

| Sr.No. | Particular of Works | SRM E-Tender No. | SRM E-Tender RFx No. |
|---|---|---|---|
| 1 | 2nd Call for Work of Annual Contract for Repair, Overhauling, Servicing, Maintenance Alignment of 220/132/ 33kV Isolator available at Various EHV Substations under EHV O&M Division, Latur | **EE/EHV/O&M/LTR/TS/ 2025-26/T-06** | 7000037266 |

For further details visit our Website **https://srmetender.mahatransco.in.**
**Contact Person:** The ADEE (O) Phone No. +918956304921.
The DYEE (O) Phone No. +918554995271.
The undersigned reserves the rights to accept or reject any or all tenders without assigning any reasons thereof.
**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Division Latur**

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी–५२/२४–२६